नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४७ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## ‘चर्चेसाठी एकमताची गरज’

### दोन्ही देशांच्या मागण्यांमध्ये मोठी तफावत म्हणून तोडगा निघण्यास विलंब



मुंबई : (स. गांवकरी)

अमेरिका आणि इराण यांच्यात अपेक्षित शांतता चर्चेची दुसरी फेरी फिस्कटल्याने दोन्ही देशातील संघर्ष पुन्हा उफाळणार का? याकडे सर्व जगाचे लक्ष लागले आहे. चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्याने दुसरी फेरी केव्हा होणार याबाबत प्रश्न उपस्थित केले जात असताना, पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात होणारी नियोजित उच्चस्तरीय चर्चा होऊ शकली नाही. दरम्यान, दोन्ही देशांमध्ये कराराच्या मसुद्यावर अद्याप एकमत झाले नसल्याचे पाकिस्तानने देखील मान्य केले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधात युद्धात सुरुवातीला दोन आठवड्यांचा युद्धविराम जाहीर केला. या यद्धविरामाची मुदत समाप्त होण्यापूर्वी दोन्ही देशांमध्ये शांतता चर्चेच्या अपेक्षित फेऱ्या पूर्ण होऊन या संघर्षावर कायमस्वरुपी तोडगा निघणे अपेक्षित होते. पण, पहिल्या चर्चेनंतर दुसऱ्यांदा उभय देशात चर्चा होऊ शकली नाही. पाकिस्तान दोन्ही देशांमधील तणाव कमी करण्यासाठी पाकिस्तान मध्यस्थ म्हणून काम करत आहे. सध्या समोरासमोर चर्चा झाली नसली तरी मध्यस्थांद्वारे वाटाघाटी सुरू असल्याचे पाकिस्तानने स्पष्ट केले आहे. इराणकडून टप्प्याटप्प्याने अंमलात येईल असा प्रस्ताव अमेरिकेसमोर मांडला आहे. यामध्ये त्यांनी आधी युद्ध थांबवणे आणि ‘हॉर्मुझची सामुद्रधुनी’व्यापारासाठी खुली करणे याला प्राधान्य दिले आहे. अण्वस्त्र कार्यक्रमाबाबतची चर्चा नंतरच्या टप्प्यात करण्याचे मत इराणचे मांडले आहे. दुसरीकडे, जोपर्यंत इराण आपल्या अण्वस्त्र कार्यक्रमावर मर्यादा आणत नाही, तोपर्यंत कोणताही करार शक्य नाही, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकी प्रतिनिधींचा इस्लामाबाद दौरा रद्द केला आहे. तसेच, आता इराणला चर्चा करायची असल्यास थेट संपर्क साधण्यास सांगितले आहे. दरम्यान, इस्लामाबादमध्ये चर्चेसाठी केलेली कडक सुरक्षा आता शिथिल करण्यात आली आहे. दोन्ही बाजूंच्या मागण्यांमध्ये मोठी तफावत असल्यामुळे तोडगा निघण्यास विलंब होत आहे. जोपर्यंत ठोस सहमती होत नाही, तोपर्यंत कोणतीही प्रत्यक्ष भेट होणार नसल्याचे पाकिस्तानने स्पष्ट केले आहे. त्यामुळे दोन्ही देशांच्या चर्चेवर आता अनिश्चिततचे सावट निर्माण झाले आहे.

#### इराणी नेत्यांची रशिया भेट

इराण आणि अमेरिका यांच्या सध्या थेट संवाद होत नसला तरी पाकिस्तान चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे इराणी नेत्यांनी नुकतेच रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांची भेट घेतली. पुतिन यांनी दोन्ही देशातील संघर्षावर तोडगा काढण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले. शिवाय त्यांनी मोजतबा खामेनी यांचा संदेश प्राप्त झाल्याचेही नमूद केले.

## वंदे-भारत एक्सप्रेसचा डबा घसरला; जिवीतहानी नाही

पुणे : (स. गांवकरी)



मुंबईहून सोलापूरकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचा डबा पुणे रेल्वे स्थानकावर सोमवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घसरला. दरम्यान, गाडीतील प्रवासी सुखरूप असून, गाडी रुळावर आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. सोमवारी पहाटेचे चार वाजून पाच मिनिटांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवरून सोलापूरकडे जाणारी वंदे-भारत एक्सप्रेस सुटली. मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास सोलापूर स्थानकावर गाडी पोहचणार होती. मात्र, सोमवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर येत असताना गाडीच्या चौथ्या डब्याची एक ट्रॉली डायमंड क्रॉसिंगवर घसरली.

या घटनेनंतर पुणे रेल्वे स्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. दरम्यान, या अपघातात कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झालेली नाही. गाडीत प्रवास करणारे सर्व प्रवासी सुखरूप असल्याचे रेल्वे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.पुणे रेल्वे स्थानकावर सुरू करण्यात आलेल्या यार्ड रिमॉडेलिंग कामांअंतर्गत प्लॅटफॉर्म क्रमांक तीनचे काम प्रस्तावित आहे. या प्लॅटफॉर्मवर वंदे भारत एक्सप्रेसचा डबा घसरला आहे. आता या घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे. दरम्यान, प्रवाशांची गैरसोय होऊ नये टाळण्यासाठी त्यांना दुसऱ्या रेकमध्ये हलवण्याची व्यवस्था तातडीने करण्यात आली. रेल्वे पोलीसांसह कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढल्याचे रेल्वे प्रशासनाकडून नमूद करण्यात आले.

मुंबईहून सोलापूरकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचा डबा पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर येत असताना घसरला. या दुर्घटनेमुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले.

> पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर सोलापूरकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेसचा डबा घसरला. या गाडीतील प्रवासी सुखरूप असून, त्यांना तातडीने दुसऱ्या रेकमध्ये हलविण्यात आले आहे. रेल्वे पोलीसांनी तातडीने मदत कार्य सुरु केले आहे. या अपघातामागची कारणांचा तपास करण्यात येत आहे.
> **- हेमंत कुमार बेहेरा, जनसंपर्क अधिकारी, पुणे रेल्वे विभाग**

## आजार बरा करण्याच्या नावाखाली महिलेवर अत्याचार

- **श्रीरामपूरच्या गणेश महाराजला अटक, भोंदूचे आणखी एक प्रकरण उघड**

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पोटाचा विकार बरा करण्याच्या नावाखाली लाखो रुपये उकळणाऱ्या व नंतर महिलेवर अत्याचार केल्याच्या आरोपावरून श्रीरामपूर शहर पोलिसांनी गणेश माधवराव शिंदे उर्फ गणेश महाराज या भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. जिल्ह्यातील भोंदूचे आणखी एक प्रकरण उघडकीस आले आहे. यापूर्वी उघडकीस आलेले संगमनेरमधील भोंदूचे प्रकरण सध्या गाजत आहे. यासंदर्भात अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूरचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख अधिक तपास करत आहेत. पीडित महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली आहे.

श्रीरामपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश शिंदे महाराजचा श्रीरामपूर तालुक्यातील खटकाळी येथे आश्रम आहे. पोटाच्या विकारावर औषध देतो, अशी माहिती पीडित महिलेला मिळाली होती. त्यानुसार ती सन २०२३ मध्ये गणेश महाराज याच्या खटकाळी येथील आश्रमात आली. तिला पोटाच्या अल्सरचा त्रास होत होता. महिलेने गणेश महाराज याला पोटाच्या दुखण्याविषयी सांगितले असता गणेश त्याने तिला लिंबू व उडीद पाण्यात टाकून प्यायला लावले. ते प्यायल्यानंतर तिला थोडी चक्कर आल्यासारखे झाले. त्यावेळी गणेश महाराजने तिच्याकडे १५ हजार रुपये मागितले व पाच दिवसांनंतर तू परत माझ्याकडे ये, तुझ्या पोटाला पूर्ण आराम मिळेल असे सांगितले.

## युरियाची गोणी ३० किलो करण्याच्या कृषिमंत्र्यांच्या मागणीवर संघटनांची टिकेची झोड

मुंबई : (स. गांवकरी)



शेतकऱ्यांकडून युरियाचा होणारा अति वापर टाळण्यासाठी युरियाची गोणी ४५ किलो ऐवजी ३० किलोंची करा. महिला, अल्पभूधारक शेतकऱ्यांना ३० किलोंची गोणी हाताळणे सोयीची होईल, असेही कृषिमंत्र्यांनी केंद्रीय खते आणि रसायन मंत्री जे. पी. नड्डा यांनी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. कृषिमंत्र्याच्या या पत्रावर शेतकरी संघटनांनी टिकेची झोड उठवली आहे.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी २२ एप्रिल रोजी केंद्रीय रसायने आणि खत मंत्री जे. पी. नड्डा यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे, शेतकरी गोणीच्या हिशोबाने आपल्या शेतात युरियाचा वापर करतो. त्यामुळे युरियाचा अतिवापर होऊन जमीन नापीक होते. त्यामुळे युरियाचा अतिवापर टाळण्यासाठी आणि महिला आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना वापराच्या दृष्टीने सोयीचे होण्यासाठी युरियाची ४५ किलोंची गोणी कमी करून ३० किलोची करावी. कमी वजनाच्या गोण्यांमुळे उपलब्ध गोण्यांच्या संख्येत ५० पट वाढ होईल. या बदलामुळे गोण्यांची संख्या सुमारे ५० टक्क्यांनी वाढेल. अनुदानातही बचत होईल. माती परीक्षण करून शेत जमिनीला कोणत्या खतांची, रसायनांची गरज आहे, हे समजून खतांचा अतिवापर टाळला पाहिजे. खतांच्या गोणीचे वजन कमी करून काहीही उपयोग होणार नाही. वजन कमी केले तरीही खत कंपन्या खतांचे दर कमी करणार नाहीत. अखेरीस कृषिमंत्र्यांची भूमिका शेतकऱ्यांच्या नव्हे तर खत कंपन्यांच्या फायद्याची होईल. कृषिमंत्र्यांनी खतांबाबत कोणताही निर्णय घेताना राज्यातील शेतकरी संघटनांशी चर्चा करण्याची गरज आहे, अशी मागणी किसान सभेचे राज्य समन्वयक डॉ. अजित नवले यांनी केली आहे.

#### युरियाची गोणी ५० किलोवरून ४५ किलो करूनही वापर वाढला

युरियाची गोणी पूर्वी ५० किलोंची होती, ती ४५ किलो करण्यात आली. त्यावेळीही युरियाचा अति वापर टाळण्याची भूमिका होती. प्रत्यक्षात युरियाचा वापर वाढतच गेला. आताही ४५ किलोची गोणी ३० किलो करण्याचा निर्णय घेतला तरीही वापर वाढणारच आहे. युरियाचा अतिवापर टाळण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये जागृती होण्याची गरज आहे, असे मत महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स, सीड्स डीलर्स असोसिएशनचे (माफदा) अध्यक्ष विनोद तराळ – पाटील यांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाइड्स, सीड्स डीलर्स असोसिएशनने (माफदा) खत कंपन्यांकडून होणारे लिंकिंग बंद करावे. अप्रमाणित एचटीबीटी कापूस बियाणांची विक्री थांबवावी. रासायनिक खते दुकानांमध्ये पोहोच मिळावीत, आदी विविध मागण्यांसाठी सोमवारपासून बेमुदत बंद पुकारला आहे. बंदच्या पार्श्वभूमीवर माफदाचे पदाधिकारी आणि कृषिमंत्री भरणे यांची बैठक आज, मंगळवारी दुपारी मंत्रालयात होणार आहे, अशी माहिती विनोद तराळ – पाटील यांनी दिली.

## बिर्याणीनंतर कलिंगड खाल्लं, मुंबईत एकाच कुटुंबातील ४ जणांचा मृत्यू

#### त्या १२ तासांत काय घडलं?

मुंबई : (स. गांवकरी)


दक्षिण मुंबईतील पायधुनी परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. शनिवारी रात्री येथील एका कुटुंबात बिर्याणीची पार्टी झाली. त्यानंतर कुटुंबाने गोड पदार्थ म्हणून कलिंगड खाल्ले. त्यानंतर रविवारी सकाळी त्यांना त्रास होऊ लागला. तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. या घटनेत कुटुंबातील चार जणांचा एकमागून एक मृत्यू झाला. अन्नातील विषबाधेमुळे हे मृत्यू झाले, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असून पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत. मोबाइल ॲक्सेसरीजचे दुकान चालवणारे अब्दुल्ला कादर (वय ४०), त्यांची पत्नी नसरीन (वय ३५), दोन मुली आयेशा (१६) आणि झैनब (१३) हे इतर पाच नातेवाईकांबरोबर शनिवारी रात्री मेजवाणीसाठी एकत्र आले होते. बिर्याणी खाल्ल्यानंतर ते पायधुनी येथील त्यांच्या घरी परतले. रात्री घरी जाईपर्यंत त्यांना कोणतीही समस्या जाणवली नाही. घरी पोहोचल्यानंतर रात्री १ वाजता कुटुंबातील सदस्यांनी कलिंगड खाल्ले. पहाटे ५ वाजता कुटुंबातील सदस्यांना अस्वस्थ वाटू लागले. उलट्या आणि अतिसारामुळे त्यांची प्रकृती खालावली. चौघांची अवस्था इतकी वाईट झाली की, त्यांना उठताही येत नव्हते.

शेजाऱ्यांना या गोष्टीची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी त्याच इमारतीत चौथ्या मजल्यावर राहत असलेल्या डॉ. कुरेशी यांना बोलावून घेतले. डॉक्टरांनी परिस्थिती पाहून प्राथमिक उपचार करण्याचा प्रयत्न केला. मात्र परिस्थिती हाताबाहेर जात असल्यामुळे त्यांना जेजे रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लहान मुलगी झैनबचा रविवारी सकाळी १०:१५ वाजता मृत्यू झाला. त्यानंतर आई नसरीन आणि मोठी मुलगी आयेशाही उपचारांना प्रतिसाद देत नव्हत्या. थोड्या वेळाने त्यांचाही मृत्यू झाला. रात्री १०.३० वाजता कुटुंबातील प्रमुख अब्दुल्ला यांचाही मृत्यू झाला.

डॉक्टर झियाद कुरेशी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, चौघांचीही प्रकृती खूपच खालावली होती. उलट्या आणि अतिसारामुळे ते खूपच





थकलेले दिसत होते. मी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला. तसेच त्यांनी रात्री काय खाल्ले होते, याची विचारपूस केली असता ते म्हणाले की, त्यांनी रात्री कलिंगड खाल्ले होते. अब्दुल्ला यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर शुद्ध आली होती. तेव्हा त्यांना रात्री काय झाले? याबाबत विचारणा करण्यात आली. यावेळी त्यांनी रात्री ९ जणांनी बिर्याणी खाल्ल्यापासूनचा पुढील घटनाक्रम कथन केला. अब्दुल्ला यांनी मृत्यूपूर्वी दिलेला जबाब महत्त्वाचा मानला जात असून पोलीस त्याअनुसार तपास करत आहेत. या घटनेमुळे अन्नातून होणाऱ्या विषबाधा प्रकरणात चिंता व्यक्त केली जात आहे. पोषणतज्ज्ञ रुपाली दत्ता यांनी एनडीटीव्हीला दिलेल्या प्रतिक्रियेत याबद्दलची अधिक माहिती दिली आहे. त्या म्हणाल्या की, कलिंगडमध्ये पाणी आणि नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे त्यात जर भेसळ असेल तर जिवाणूंची झपाट्याने वाढ होऊ शकते. कलिंगडमध्ये गोडवा वाढावा यासाठी त्यात ग्लुकोजचे पाणी आणि साखरेचे पाणी इंजेक्शनद्वारे टोचले जाते, अशा बातम्या अधूनमधून समोर येतात. रुपाली दत्ता म्हणाल्या की, अशाप्रकारे जर भेसळ केली जात असेल तर जिवाणूंची वाढ झपाट्याने वाढू शकते. आहारतज्ज्ञ डॉ. अर्चना बत्रा यांनीही एनडीटीव्हीला कलिंगड खाल्ल्यामुळे विषबाधा होऊ शकते का? याबाबत माहिती दिली. त्या म्हणाल्या, जेव्हा एखाद्या फळाला साल्मोनेला संसर्ग, लिस्टेरियोसिस यासारख्या रोगजंतूचा संसर्ग होतो, तेव्हा अशी फळे खाल्ल्यामुळे डीहायड्रेशन किंवा इतर आरोग्याच्या समस्या जाणवू शकतात. मुंबई पोलिसांचे पोलीस उपआयुक्त प्रवीण मुंडे यांनी सांगितले की, शवविच्छेदनादरम्यान चौघांच्या शरीरातून जे नमुने (व्हिसेरा) संकलित करण्यात आले आहेत, ते रासायनिक विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी फॉरेन्सिक आणि अन्न विभाग संयुक्तपणे चौकशी करत आहे. कुटुंबातील सदस्यांनी खालेल्या कलिंगडमध्ये काही बाह्य विषारी पदार्थ किंवा भेसळ होती का? याचाही तपास राज्याचा अन्न व औषध प्रशासनाकडून केला जात आहे.

#### कलिंगड खाण्याची योग्य वेळ कोणती?

कलिंगड किंवा कोणतेही फळ खाण्याची उत्तम वेळ कोणती? याबाबतही दत्ता यांनी माहिती दिली. त्या म्हणाल्या, कलिंगड खाण्याची उत्तम वेळ ही सकाळी किंवा दुपारच्या जेवणा दरम्यान असू शकते. रात्री उशिरा फळ खाल्ल्याने आपोआप विषबाधा होत नाही. पण जर फळ दूषित असेल किंवा ते पचविण्याची शरीराची क्षमता कमी असेल तर मात्र त्रास होऊ शकतो.

#### संशयास्पद मृत्यूचा तपास सुरू

पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्यूची नोंद केली असून चौघांचेही शवविच्छेदन करण्यात आले आहे. १२ तासांच्या अंतराने एकाच कुटुंबातील चौघाही सदस्यांचा संशयास्पद पद्धतीने मृत्यू झाल्यामुळे या प्रकरणातील गूढ वाढले आहे. अन्नातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त केला जात असल्यामुळे पोलिसांनी घरातून अर्धवट खालेल्या कलिंगडाचे तुकडे ताब्यात घेतले असून ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले.

## थोडक्यात...

### राज्यात आता नदी पुनरूज्जीवन प्राधिकरण

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील ५४ प्रदूषित नद्यांचे प्रदूषण दूर करून त्यांचे आरोग्य सुधारण्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य नदी पुनरूज्जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सध्याच्या प्राधिकरणांच्या यादीत आणखी एका प्राधिकरणाची भर पडली आहे. राज्य नदी पुनरूज्जीवन योजना, नदी पुनरुज्जीवनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर), सांडपाणी प्रक्रिया केंद्रांचे नियम, नदीकाठचे अतिक्रमण, औद्योगिक सांडपाणी विषयक उपविधी इत्यादी नदीचे प्रदूषण दूर करण्याकरिता आवश्यक असलेल्या पूरक धोरणांची शिफारस हे प्राधिकरण करेल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील (एमपीसीबी) दोन हजार कोटींची राखीव गंगाजळी (कॉर्पस फंड) प्राधिकरणास उपलब्ध करून दिला जाणार आहे. या शिवाय राज्य, केंद्र सरकारकडून वेळोवेळी येणारा निधी, खासगी कंपन्यांकडून येणार सीएसआर, वित्तीय संस्था या माध्यमातून प्राधिकरणाची निधीची गरज भागविली जाईल.

### चौंडीचा कायापालट होणार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थान चौंडीचा (या. जामखेड ) विकास सर्वसमावेशक व नियोजनबद्ध पद्धतीने करत दर्जेदार सुविधांच्या माध्यमातून पर्यटनास चालना द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळ, चोंडी येथील जतन, संवर्धन व विकास आराखड्यासंदर्भात बैठक आज, सोमवारी मुंबईत झाली. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नियोजन विभागाच्या शैला ए, जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

### महाचतुर AI चॅटबॉट लॉँच

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, उद्योजकता आणि मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणारा ‘महाचतुर एआय चॅटबॉट’ हा राज्यासाठी परिवर्तनकारी उपक्रम आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकारातून विकसित करण्यात आलेला हा चॅटबॉट देशातील अशा प्रकारचा पहिलाच अभिनव उपक्रम आहे. या चॅटबॉटमुळे युवा वर्गाचा शिक्षण ते रोजगार हा प्रवास अधिक सुकर होणार असून उद्योगांना कुशल मनुष्यबळ त्वरित उपलब्ध होणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाने शिकाऊ उमेदवारी क्षेत्रात नाविन्यपूर्ण बदल घडवण्यासाठी आणि रोजगाराभिमुख उमेदवारांचा वेळ वाचण्यासाठी ‘महाचतुर एआय चॅटबॉट’ हा हा नाविन्यपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म लॉँच केला आहे. राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (एनएपीएस) आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (एमएपीएस) अंतर्गत शिकाऊ उमेदवारी योजनेचा लाभ घेताना युवकांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. शिकाऊ उमेदवारी रोजगाराच्या संधीसाठी भाषिक एआय सहाय्यकचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## उन्हाच्या तडाख्यात शितपियांच्या दुकानात नागरिकांची गर्दी

कनाशी (स. गांवकरी) : मार्च महिना संपताच एप्रिल महिन्यात तापणात प्रचंड वाढ झाली आहे तर शहरातील नागरिक या उकाड्याने हैराण झाले आहेत शहरातील मुख्य रस्त्यांवर वाढत्या तापमानामुळे सध्या शुकशुकाट पहायला मिळत आहे तर त्यामुळे सकाळच्या बारा वाजेपासून उन्हाचा तडाखा बसत असल्याने घशाला कोरड सुटते अशातच नागरिकांची पाऊले आपोआपच थंडगार शितपियाकडे वळत आहे. वाढत्या उन्हामुळे उसाचा रस,ताक लस्सी ,कोल्ड्रिंक्स, सारख्या थंडगार वस्तूंना कनाशी सह तालुक्यात मोठ्या प्रमाणात मागणी वाढली आहे शहरातील थंडगार शितपियांचे दुकाने च्या ठिकाणी गर्दी पहायला मिळत आहे. तर दुपारी बाहेर पडतांना उन्हाच्या झळापासून सवरक्षण करण्यासाठी टोपी ,स्कार्प, रुमाल,किंवा छत्री चा वापर करावा लहान मुलं वयोवृद्धांना शक्यतो बाहेर जाणे टाळावे वाढत्या उन्हामुळें लहान मुलांच्या शरीरात पाणी कमी झाल्याने चक्कर येणे,धाप लागणे,ताप येणे ,इत्यादी समस्या उद्भवू शकतात.डिहायड्रेशन होऊ नये म्हूणून पाणी जास्तीत जास्त प्यावे उन्हाळा वाढला की फ्रिज मधील पाण्याची आठवण येत मात्र फ्रिजच्या पाण्याऐवजी माठातील पाणी प्यावे त्याचबरोबर थंड पाण्याने अंघोळ करणे टाळावे आपण आपली ज्या प्रमाणे काळजी घेतो तशीच काळजी पशु पक्षी प्राणी जनावरे यांच्याकडेही लक्ष द्यावे.आपल्या घरावर किंवा छतावर पाण्याची भांडी भरून ठेवावी छोट्या झाडांना योग्य वेळी भरपूर पाणी द्यावे उन्हाचे दिवसात योग्य ती काळजी घ्यावी.

## कैऱ्यांनी लगडली आंब्याची झाडे

नारायणगाव (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात सध्या आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात कैऱ्या लागल्या असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.यावर्षी हवामान अनुकूल राहिल्यास आंब्याचे उत्पादन चांगले होईल,असा अंदाज आंबा उत्पादकांनी व्यक्त केला आहे.चालू वर्षी सर्व आंब्याच्या झाडांना प्रचंड मोठ्या प्रमाणावर मोहोर लागला होता. परंतु दूषित हवामानमुळे बऱ्याचशा झाडांना मोहोर गळून गेला आहे. त्यातल्या त्यात बऱ्याच आंब्यांचा मोहोर टीकला असून त्यांना मोठ्या प्रमाणावर फळ लागली आहेत. जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर पायरी, तोतापुरी, राजापूरी, नीलम, केसर या आंब्यांच्या झाडांची लागवड केली जाते. बऱ्याच ठिकाणी ही आंब्याची झाडे कैऱ्यांनी लगडली असली तरी एप्रिल महिन्याचा शेवटचा आठवडा आणि मे महिन्याचे पहिले पंधरा दिवस वादळी वारे आणि अवकाळी पावसाचा असतो.अशा परिस्थितीत झाडांना लागलेल्या कैऱ्यांची मोठ्या प्रमाणात पडझड होण्याची शक्यता असून कैऱ्या गळून उत्पादनात घट होऊ शकते अशी शक्यता नारायणगाव येथील प्रगतशील शेतकरी व आंबा उत्पादक राजेंद्र दिनकर पवार, सुजाता भुजबळ व राजेंद्र गायकर हे व्यक्त करत आहे.



## खडकी लाखनी गावात पार पडला तीन दिवसीय भव्य रथोत्सव

कनाशी (स. गांवकरी) : कळवण तालुक्यातील खडकी , लखाणी येथे सालाबादप्रमाणे अक्षय तृतीया निमित्त तीन दिवसीय चालत असलेला रथ काढण्याची वडिलोपार्जित चालत आलेली ही परंपरा आजही येथील गांवकरी मोठ्या हिरीरीने सहभागी होत या कार्यक्रमाची परंपरा जोपासत आहे .अक्षय तृतीयेला तीन दिवसीय कार्यक्रम केला जातो यात पहिल्या दिवशी मारुती मंदिरासमोर देवांचा मांडव घालण्यात येतो तर रात्री घऱ्यादेवांची पारंपरिक पद्धतीने ओवाळणी करतात या धार्मिक विधींना ग्रामस्थ आपली प्रार्थनीय उपस्थिती दाखवतात तर दुसऱ्या दिवशी बैल गाडीवर रथ ठेऊन तो तीन दिवस गावात फिरवला जातो भव्य अशी संबळाच्या ठेक्यावर गावकरी ठेका धरत भव्य असा रथ संपूर्ण गावात मिरवला जातो गावातील प्रत्येकाच्या घरी या रथाची पूजा केली जाते नारळ फोडला जातो या रथ उत्साह कार्यक्रमानिमित्त मनोरंजन म्हणून तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी रात्री 8 वाजता पाठविहिर येथील नावाजलेला महेंद्र चौरे सह आबा साबळे यांचा लोकनाट्य तमाशा मंडळ पाठविहिर तर दुसऱ्या दिवशी खेरुडे येथील लोकनाट्य तमाशा मंडळाचे आयोजन करण्यात आले होते तमाशा बघण्यासाठी दूरवरून बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. सदर कार्यक्रमात ग्रामस्थ तरुण मंडळी महिला मोठ्या उत्साहात सहभागी होत कार्यक्रमाचा उत्साह वाढवतात. वडिलोपार्जित चालत आलेली ही परंपरा तिसऱ्या दिवशी गावाला सुख मिळावा यासाठी हा सुख बोळावा म्हणजेच (आसाळ्या) काढल्या जातात शेवटी सकाळी पहाटे झुंज्या मुंझ्यात कार्यक्रमाची सांगता होते त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.

# नेवासा तालुक्यात गुन्हेगारांची खैर नाही

### कायदा हातात घेणाऱ्यांना पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांचा कडक इशारा

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर नवनियुक्त पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी तालुक्यातील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी कंबर कसली आहे. तालुक्यात कोणीही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास किंवा शांतता भंग करण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. (MPDA) अंतर्गत कडक कारवाई करून त्यांना स्थानबद्ध करण्यात येईल, असा सज्जड इशारा त्यांनी दिला आहे. यावेळी पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. ज्या गुन्हेगारांवर दोन किंवा त्यापेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत, अशा सराईत गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली आहे. या गुन्हेगारांना लवकरच पोलीस स्टेशनमध्ये बोलावून त्यांची ओळख परेड' केली जाणार आहे. या परेडच्या माध्यमातून त्यांना कडक शब्दात समज देऊन अंतिम इशारा दिला जाणार असल्याचे ढिकले यांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांतील घटनांच्या पार्श्वभूमीवर बोलताना पोलीस निरीक्षक ढिकले म्हणाले की, "नेवासा तालुक्यात शांतता आणि सुव्यवस्था टिकवणे ही आमची प्राथमिकता आहे. जे गुन्हेगार सातत्याने कायद्याचे उल्लंघन करतात आणि ज्यांच्यामुळे जनजीवनावर परिणाम होतो, अशांना आता दयामाया दाखवली जाणार नाही. रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. सारख्या कडक कायद्यान्वये कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत." कोणीही कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन करत त्यांनी स्पष्ट केले की: "जर कोणी स्वतःला कायद्यापेक्षा मोठे समजत असेल आणि कायदा हातात घेण्याचे धाडस करत असेल, तर त्यांना *"कायदा काय असतो"* हे पोलीस प्रशासनाकडून कडक कार्यवाही मधून दाखवून दिले जाईल. सामान्य नागरिकांनी घाबरण्याचे कारण नाही, मात्र गुन्हेगारांनी आपली सुधारणा करावी अन्यथा परिणाम भोगण्यास तयार राहावे."



## श्री सिद्धेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये 'जागतिक हिवताप दिन' साजरा

प्रवरासंगम : (समर्थ गांवकरी)

येथील श्री सिद्धेश्वर इंग्लिश स्कूल मध्ये २५ एप्रिल रोजी 'जागतिक हिवताप दिन' मोठ्या उत्साहात आणि जनजागृतीपर वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना हिवताप (मलेरिया) या आजाराची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय यांबाबत सविस्तर माहिती मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्राथमिक आरोग्य केंद्र, टोका येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. सुकासे सर व डॉ. पटेल सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले आरोग्य निरीक्षक श्री. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "हिवताप हा डासांमुळे होणारा आजार असून परिसरात स्वच्छता राखणे आणि पाणी साचू न देणे हाच त्यावर प्रभावी उपाय आहे." त्यांनी डेंग्यू आणि मलेरिया पसरवणाऱ्या डासांची उत्पत्ती कशी रोखावी, याच्या प्रात्यक्षिक टिप्सही विद्यार्थ्यांना दिल्या.

## पिक विमा रखडल्याने तालुक्यातील शेतकरी आक्रमक

नेवासा : (समर्थ गांवकरी)

खरीप हंगाम २०२५-२६ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी कपाशी, तूर, सोयाबीन यांसारख्या पिकांचे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना शासकीय अनुदानासोबतच प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित होते. मात्र, आता - रब्बी हंगाम संपत आला असून मार्चएण्ड सुरू आहे. तरीही खरीप आणि रब्बी हंगामातील पिकविमा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. यामुळे पिकविमा कंपनी आणि सरकारकडून शेतकऱ्यांचा खेळ सुरू असल्याचा आरोप होताना दिसत आहे.अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्याप पिक विम्याची कोणतीही भरपाई मिळालेली नाही. तालुक्यात अतिवृष्टीने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असतानाही शासनाने दिलेले शंभर टक्के भरपाईचे आदेश प्रत्यक्षात कागदावरच राहिल्याचे चित्र आहे.


## वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय – बीयू. ५ए एसएफएस फ्लॅट्स, इन्कम टॅक्स कॉलनी जवळ, आऊटर रिंग रोड, पीतमपुरा, दिल्ली ११००३४ CIN-U42201DL2025GOI450109

सार्वजनिक सूचना

वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडच्या

पारेषण परवाना मंजुरी अर्जावर (प्रकरण क्र. ६२/२०२६) सूचना/हरकती आमंत्रित

१. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड पारेषण मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे परवाना आधी महाराष्ट्र वीज नियामक कमिशन खाली विद्युत कायदा, २००३ च्या कलम १४ आणि १५ आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियम, २००४ च्या तरतुदींनुसार, माननीय आयोगाने २२ एप्रिल २०२६ रोजी अर्ज दाखल करून घेतला आहे आणि वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडला विद्युत कायदा, २००३ च्या कलम १५(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. नवीकरणीय ऊर्जा (आरई) विजेच्या वहनातील अडथळे दूर करण्यासाठी आणि वहन क्षमता वाढवण्यासाठी, वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना आंतर–राज्यीय पारेषण प्रणाली मजबूत करण्याकरिता एक विशेष उद्देश वाहन (विशेष उद्देश वाहन) म्हणून करण्यात आली आहे. याअंतर्गत ४००/२०० केव्ही एआयएस वागदारी (जि. सोलापूर) तसेच अनेक सर्किट्सवर संबंधित लाईन्स आणि बेजची व्यवस्था स्थापित केली जाईल. प्रकल्प आहे झाले पुरस्कार प्रदान केला माध्यमातून दर महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडद्वारे आयोजित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया.

३. प्रकल्पात खालील बाबींचा समावेश आहे.

| अ. क्र. | पारेषण योजनेची व्याप्ती | प्रभावी तारखेपासून नियोजित सीओडी | प्रकल्पाच्या घटकाच्या नियोजित (सीओडी) वर वसूल करण्यायोग्य उध्दत पारेषण शुल्काची टक्केवारी | संबंधित घटकाच्या व्यावसायिक कार्यान्वयनाची (सीओडी) घोषणा करण्यासाठी पूर्व. आवश्यक असलेले घटक |
|---|---|---|---|---|
| १ | ३X५०० MVA, ४००/२२० kV ICT आणि ४०० केव्ही पातळीवर<br>१X१२५ MVAr बस रिॲक्टरसह एआयएस वागदारीची स्थापना.<br>*४०० / २०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी – ०३ नग.<br>*१२५ चतअी, ४०० केव्ही बस अणुभट्टी – १ क्र<br>*४०० केव्ही लाईन बे – ०४ नग.<br>*४०० केव्ही आयसीटी बे – ०३ नग<br>*४०० केव्ही बस रिॲक्टर बे– ०१ नं.<br>*२२० केव्ही लाईन बे – ०४ नग.<br>*२२० केव्ही आयसीटी बे – ०३ नग.<br>भविष्यातील अवकाश तरतुदी –<br>*१ द ५०० एमव्हीए ४००/२२० केव्ही आयसीटीची स्थापना<br>*४००/२०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी – ०१ नं.<br>*४०० केव्ही आयसीटी बे – ०१ नं.<br>*२२०केव्ही आयसीटी बे – ०१ नं. | एसपीव्ही हस्तांतरणा पासून २४ महिने | १०० % | योजनेच्या सर्व घटकांचे एकाच वेळी कार्यान्वयन करणे आवश्यक आहे, कारण त्यांचा वापर एकमेंकाच्या कार्यान्वयनावर अवलंबून आहे. |
| २ | *४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) ते ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन (प्रस्तावित)<br>*४०० केव्ही, ६३ एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ४०० केव्ही एआयएस वागदारी–०२ एनओएस वर<br>* ४०० केव्ही, ५० एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) येथे (प्रस्तावित) – ०२ नग<br>*७६५ केव्ही एआयएस वर ४०० केव्ही एआयएस लाइन बे पुणे (पूर्व) (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ३ | *४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून ४०० केव्ही सोलापूर पूलिंग स्टेशन (सेक्टर–०२) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन<br>*४०० केव्ही सोलापूर येथील ४०० केव्ही लाईन बे पूलिंग स्टेशन (सेक्टर–२) – ०२ नग | | | |
| ४ | *४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून २२० केव्ही एआयएस खडवागदारी (प्रस्तावित) पर्यंत २२० केव्ही डी/सी लाइन<br>*२२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस वागदारी (प्रस्तावित) – ०२ नग | | | |
| ५ | * ४०० केव्ही एआयएस वागदारी येथे सौर जनित्रांसाठी ४०० केव्ही लाईन बेची स्थापना. *४०० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ६ | * वागदारी येथील ४०० केव्ही एआयएस येथे सौर जनित्रांसाठी २२० केव्ही लाईन बेची स्थापना. *२२० केव्ही लाईन बे – ०४ नग | | | |
| ७ | *४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून २२० केव्ही एआयएस नारंगवाडी (विद्यमान) पर्यंत २२० केव्ही डी/सी लाईन.<br>*२२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस नारंगवाडी (विद्यमान) – ०२ नग | | | |

४. टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने अर्जदाराचे अधिग्रहण केले असून, महाराष्ट्र राज्यात सदर आंतर–राज्य पारेषण प्रणालीची स्थापना, संचालन आणि देखभालीसाठी पारेषण परवाना मिळवणे आवश्यक आहे. त्यानुसार, वागदारी पॉवर ट्रान्समिशन लि. ने पारेषण परवाना मिळवण्यासाठी माननीय आयोगासमोर ही याचिका दाखल केली आहे.

५. कमिशन आहे दिग्दर्शित वागदारी संसर्ग मर्यादित प्रसारण परवानगीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/आक्षेप मागवणे परवाना माध्यमातून हे सूचना. संपर्क तपशील च्या नोडल व्यक्ती ज्यांच्याकडून अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी मिळवता येईल, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

a. **नाव :** श्री. विनोद कुमार

b. **अर्जाची प्रत पाहणी किंवा खरेदीसाठी मिळवण्याचा पत्ता :** केसीसी बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड, ८ मजला, टॉवर–ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१

c. तपासणी किंवा खरेदीची वेळ: कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी १७:०० च्या दरम्यान

d. सविस्तर अर्ज कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) १००/– रोख किंवा DD/ चेकद्वारे भरल्यावर CDसोबत वागदारी ट्रान्समिशन मर्यादित देय रक्कम नवी दिल्ली येथे देय आहे.

e. ज्या वेबसाईटवरून अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करता येईल, त्या वेबसाईटचा पत्ता : https://kccbuildcon.co.in/

६. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही सूचना/आक्षेप नोंदवायचे आहेत, ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात अपलोड करून सादर करू शकतात. 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' MERC वेबसाईटवरील टॅब ( www.merc.gov.in/e-public-consultation). हे वैशिष्ट्य वापरण्यात काही अडचण आल्यास, संबंधित हितधारकांनी संपर्क साधावा. कॅन संपर्क मर्क कार्यालय वर मोबाईल क्रमांक : ८९२८०७१५२२ किंवा वर ईमेल आयडी: सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० च्या दरम्यान suggestions@merc.gov.in वर पाठवा.

७. ज्या व्यक्तीने सूचना आणि आक्षेप अपलोड केले आहेत 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' टॅबने त्याच्या सबमिशनची कोणतीही हार्ड कॉपी दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीकडे इलेक्ट्रॉनिक सुविधा नाही माध्यमे कॅन फाइल त्यांचे सूचना आणि आक्षेप मध्ये अ कठीण प्रत यांना उद्देशून **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी), १३ वा मजला, सेंटर नं. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४००००५, सोबत श्री. डी. के. वालेचा, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., (सीओओ, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., ८ वा मजला, टॉवर–ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१, ईमेल:** dkvalechakccbuildcon.co.in) यांच्यावर नोटीस बजावल्याचा पुरावा पाहिजे वाहून नेणे प्रेषकाचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ईमेल पत्ता (असल्यास). यानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि / किंवा आक्षेप १७:०० वाजता २५ मे २०२६ रोजी विचारात घेतले जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

८. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड प्रत्येक आक्षेपाला/टिप्पणीला उत्तर देईल. तीन दिवसांच्या आत मिळाले च्या त्याची पावती पण नाही नंतर पेक्षा २८ मे २०२६ २५ मे २०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांसाठी/टिप्पण्यांसाठी.

एसडी /–

**ठिकाण : दिल्ली**

**दिनांक : २५.०४.२०२६**

**देवेंद्र कुमार वालेचा,**

**सीओओ (प्रशिक्षण आणि विकास)**


# २०२९ ची विधानसभा मीच लढणार : खासदार नीलेश लंके यांची घोषणा

### लंके यांचा झंझावाती तालुका दौरा

पारनेर : (स. गांवकरी)

आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पारनेर तालुक्याचा झंझावाती दौरा सुरू केला असून, या दौऱ्याच्या माध्यमातून त्यांनी कार्यकर्त्यांना थेट मार्गदर्शन करत निवडणूक रणधुमाळीचा बिगुल फुंकला आहे. पारनेर शहरात फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणाबाजीत खा. लंके यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दौऱ्याची सुरुवात झाली. त्यानंतर ढवळपुरी व टाकळी ढोकेश्वर गटात बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. यावेळी बोलताना खा. लंके यांनी स्पष्टपणे सांगितले की,



"कुणाची तरी जिरवायची होती म्हणून मी लोकसभा निवडणूक लढविली; मात्र आता येणारी विधानसभा निवडणूक मी स्वतः लढणार आहे." तसेच, सन २०२९ मध्ये मुंबईत सक्रिय राजकारण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली. "ज्या ठिकाणी अन्याय होईल, तिथे संघर्ष करा, धाक निर्माण करा आणि गरज पडल्यास आंदोलन करा. निवडणुका संपल्यानंतर कोणी कोणाला विचारत नाही, त्यामुळे गावोगाव संघटित होऊन जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने काम करा," असे आवाहन त्यांनी केले. "कार्यकर्ता हा रेसच्या घोड्यासारखा असला पाहिजे. मी आजही २०-२० तास काम करतो," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना अधिक जोमाने कामाला लागण्याचे निर्देश दिले. आगामी निवडणुकांसाठी लक्ष्य निश्चित करताना त्यांनी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच किमान ८५ ग्रामपंचायती ताब्यात घेण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यासाठी बूथस्तरावर संघटन मजबूत करण्यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विधानसभा निवडणुकीनंतर आलेल्या मरगळीकडे लक्ष वेधत ते म्हणाले, "झाले गेले गंगेला मिळाले. नकारात्मक विचार सोडून सकारात्मकतेने कामाला लागा. मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे." आपल्या कार्याचा आढावा देताना खा. लंके यांनी सांगितले की, मतदारसंघात २ हजार कोटी रुपयांची विकासकामे करण्यात आली असून १ लाख ५१ हजार नागरिकांना वैयक्तिक मदत देण्यात आली आहे. तसेच, रुग्णालयातील गरजू रुग्णांची दरमहा १५ ते २० लाख रुपयांची बिले माफ करून देण्याचे काम केले जात आहे. मुख्यमंत्री व पंतप्रधान सहायता निधीतून मोठ्या प्रमाणावर मदत मिळवून दिल्याचे त्यांनी नमूद केले.

युवकांसाठी उद्योग शिबिरे, रोजगार प्रशिक्षण, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, अपंगांना सक्षम बनविणे अशा विविध उपक्रमांची माहिती देत "मी राजकारण करत नाही, समाजकारण करतो," असे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत विविध मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. ढवळपुरीचे माजी सरपंच डॉ. राजेश भनगडे यांनी तरुणांच्या उत्साहाचे कौतुक करत बुथनिहाय प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली. नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर यांनी संघटन मजबूत करण्यासाठी दरमहा गटानिहाय बैठका घेण्याचा निर्णय जाहीर केला. बाबाजी तरटे यांनी ३६५ बुथवर बीएलए नेमणुकीवर भर देण्याचे सांगितले, तर अर्जुन भालेकर यांनी आगामी निवडणुकीत विजयाचा विश्वास व्यक्त केला. गंगाराम बेलकर यांनी दौऱ्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाल्याचे नमूद केले.

यावेळी मोहन रोकडे यांनी "या दौऱ्यामुळे विरोधकांची झोप उडाली आहे," असे सांगत आगामी निवडणुकीत विजयाचा निर्धार व्यक्त केला. याशिवाय पोपट गुंड, अशोक घुले, सोनिया राजदेव, भरत आंधळे, अभिजित झावरे, प्रकाश राठोड, संदीप ठाणगे, बापूसाहेब शिर्के आदींनीही आपली मते मांडली.

टाकळी ढोकेश्वर येथे पुष्पवृष्टीत स्वागत झाल्यानंतर कर्जुले हर्या येथे मेळावा पार पडला. खा. लंके यांची रॅली टाकळीच्या बाजारपेठेतून जात असताना व्यापाऱ्यांनी दुकान बाहेर येत लंके यांचे स्वागत केले. छायापुढील काळात प्रत्येक गटात जाऊन बैठका घेऊन स्थानिक प्रश्न, संघटन बांधणी आणि निवडणूक रणनीती यावर सखोल चर्चा केली जाणार आहे. या प्रसंगी संभाजी रोहोकले, विकास रोहोकले, ॲड राहुल झावरे, लाला भोंडवे, कांतिलाल भोसले, अमोल यादव, रवींद्र राजदेव, रविंद्र गायखे, अजित भाईक, गणेश मधे, भागजी गावडे, अभयसिंह नांगरे, चंद्रभान ठुबे, डॉ. संतोष गुंजाळ, गंगाराम उंडे, डॉ. बाळासाहेब कावरे, नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे, उपनगराध्यक्ष सुप्रिया शिंदे, दिपाली औटी, विकास रोहोकले, योगेश मते, राजू शेख, विजय डोळ, रा या औटी, प्रकाश गाजरे, रामदास दाते, अमोल उगले, दत्ता निवडूंगे, सचिन पठारे, प्रकाश गुंड, आप्पासाहेब शिंदे, सुखदेव चितळकर, राजू रोडे, राजू शिंदे, दादा सुंबे, शिवाजी लावंड, बाळासाहेब हिलाळ, रामा तराळ, अनिल गंधात्ते, भाऊ निवडुंगे, श्रीरंग रोकडे, चंदू खेमनर, संजय रोकडे, दीपक लंके आदींसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वन विभागाच्या निष्क्रियतेने

# ऐतिहासिक वारसा जळाला!

**ब्राम्हणवाड्यातील १८६० सालचे ब्रिटिशकालीन शासकीय विश्रामगृह आगीत भस्मसात; डॉ. विश्वासराव आरोटे यांचा संताप, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी!**





ब्राम्हणवाडा : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या ब्राम्हणवाडा गावातील १८६० सालचे ब्रिटिशकालीन ऐतिहासिक शासकीय विश्रामगृह भीषण वनव्याच्या तडाख्यात पूर्णतः भस्मसात झाले असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे ऐतिहासिक वारशाचा हा अमूल्य ठेवा राखेत परिवर्तित झाल्याचा आरोप करत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी वन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पंचायत समितीवर जोरदार टीका केली आहे.

घटनास्थळी तात्काळ धाव घेत डॉ. विश्वासराव आरोटे यांनी परिस्थितीची पाहणी करत संतप्त प्रतिक्रिया दिली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "हे फक्त एका इमारतीचे नुकसान नाही; हा इतिहासाचा खून आहे."

**काही मिनिटांत पेटली ऐतिहासिक वास्तू; ग्रामस्थांनी जीव धोक्यात घालून केली धडपड!**

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास विश्रामगृहाच्या पाठीमागील डोंगररांगेत वनवा पेटला.

उन्हाची तीव्रता आणि वाऱ्याचा वेग यामुळे काही क्षणांतच आग भीषण बनली आणि थेट शासकीय विश्रामगृहाला वेढा घालत इमारतीने पेट घेतला.

आगीची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि अकोले नगरपंचायतीचे अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले.

जिवाची पर्वा न करता ग्रामस्थांनी व अग्निशमन दलाने आग विझवण्याचा प्रयत्न केला; मात्र आगीच्या रौद्ररूपामुळे संपूर्ण इमारत काही क्षणांत राख झाली.

**"वन विभाग झोपला होता का?" – डॉ. विश्वासराव आरोटे यांचा संतप्त सवाल!**

घटनेनंतर डॉ. आरोटे यांनी वन विभागावर गंभीर आरोप करत म्हटले— "गेल्या चार-पाच वर्षांपासून या भागात सातत्याने वनवे लागत आहेत. आम्ही वारंवार वन विभागाला सूचना दिल्या, बातम्या केल्या, पाठपुरावा केला; पण अधिकाऱ्यांना अजूनही जाग आलेली नाही. आग लागून तास उलटले तरी वन विभागाचा एकही जबाबदार अधिकारी घटनास्थळी दिसला नाही. मग हे अधिकारी नेमके करतात तरी काय?"

त्यांनी पुढे सांगितले की— "वन विभागाला सर्वाधिक निधी, वाहने, कर्मचारी आणि विशेष अधिकार आहेत. तरीही जंगल, वन्यजीव आणि सरकारी मालमत्ता सुरक्षित राहू शकत नाहीत, ही लाजिरवाणी बाब आहे."

**वनव्यामागे मानवनिर्मित कारण? चौकशीची मागणी:**

या आगीबाबत संशय व्यक्त करत डॉ. आरोटे म्हणाले— "वनात आग नैसर्गिक लागते की लावली जाते, हा तपासाचा विषय आहे. अशा घटना वारंवार होत असतील तर कुणीतरी हेतुपुरस्सर आग लावत आहे का, याची चौकशी झाली पाहिजे. दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा झाली पाहिजे."



**वन्यजीवांचाही बळी; मोर-काळवीटांसाठी प्रसिद्ध परिसर धोक्यात!** ब्राम्हणवाडा परिसर हा मोर, काळवीट, दुर्मिळ पक्षी व विविध वन्यजीवांसाठी ओळखला जाणारा जैवविविधतेचा पट्टा आहे.

या वनव्यामुळे वन्यजीवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची भीती व्यक्त होत आहे.

डॉ. आरोटे म्हणाले "वन्यजीवांचे संरक्षण करणे हे वन विभागाचे मूलभूत कर्तव्य आहे. पण त्यांच्या हलगर्जीमुळे आज वन्यजीव, वनराई आणि ऐतिहासिक वारसा तिन्ही जळत आहेत."

## ब्राम्हणवाडा ग्रामपंचायतीकडे ताबा द्या; आम्ही जतन करू

### डॉ. विश्वासराव आरोटे

**ग्रामपंचायतीकडे ताबा द्या; आम्ही जतन करू – ठाम भूमिका!**

डॉ. आरोटे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व पंचायत समितीला थेट इशारा देत म्हटले—

जर प्रशासनाला या ऐतिहासिक वास्तू जतन करता येत नसतील, तर ब्राम्हणवाडा व कोतुळ येथील शासकीय विश्रामगृहे ग्रामपंचायतीच्या ताब्यात द्यावीत. ग्रामपंचायत ती वास्तू जिवंत ठेवेल, विकसित करेल आणि लोकांच्या उपयोगात आणेल."



त्यांनी सुचवले की या वास्तूंचा वापर—सामाजिक कार्यक्रमांसाठी. गरीबांच्या लग्नसमारंभासाठी. ग्रामस्तरीय उपक्रमांसाठी. मुलांच्या खेळाच्या जागेसाठी. सांस्कृतिक केंद्र म्हणून करता येऊ शकतो.

**नुकसानभरपाई अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करा!** डॉ. आरोटे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना थेट आवाहन करत म्हटले "वन विभागाच्या नाकर्तेपणामुळे सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या नुकसानीची भरपाई वन विभागाकडून किंवा संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करण्यात यावी."

स्थानिक नागरिकांचा सवाल – "आग लागेपर्यंत अधिकारी कुठे होते?"

**स्थानिक ग्रामस्थांनीही संताप व्यक्त करत विचारले— "गेल्या आठ दिवसांपासून परिसरात ठिकठिकाणी वनवे लागत होते. वारंवार माहिती देऊनही वन विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना केली नाही. मग अशा विभागाचा उपयोग काय?"**

### प्रशासनासाठी शेवटचा इशारा

ब्राम्हणवाड्यातील ऐतिहासिक विश्रामगृहाची राख आता प्रशासनाच्या निष्क्रियतेची साक्ष देत आहे. स्थानिक नागरिकांनी स्पष्ट इशारा दिला आहे की— "आता तरी प्रशासन जागे झाले नाही तर पुढील आंदोलन अधिक तीव्र होईल."



# थोडक्यात पण महत्वाचे



## गीता परिवाराच्या संस्कार शिबिराला राहुरीत चांगला प्रतिसाद

राहुरी (स. गांवकरी) : राहुरी येथील गीता परिवाराच्या वतीने मुलांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याला शहरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. श्री आचार्य गोविंद गिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने गीता परिवाराच्या वतीने मुलांसाठी संस्कार शिबिर आयोजित करण्यात येते . राहुरी शहरातील गोकुळ कॉलनी मधील योगा हाल येथे हे शिबिर 23 एप्रिल पासून सुरू झाले आहे . या शिबिरात भगवत गीता ,बोधकथा ,योगासने ,थोर पुरुषांचे जीवन चरित्र ,मनोरंजन ,रांगोळी ,आदी गोष्टी तज्ञ मार्गदर्शकाकडून घेण्यात येत आहेत . या शिबिराला शहरातून मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले. 26एप्रिल रोजी मुलांची प्रभात फेरी काढण्यात आली. योगा केंद्र ते शनि मंदिर मार्गावर मुलांनी घोषणा, फलक यासह हि फेरी पूर्ण करून हनुमान चालीसा पाठ केला. मंदिरात आदरणीय नगराध्यक्ष श्री मोरे सर यांनी मुलांना मार्गदर्शन केले. सदर शिबिराला काल संगमनेर येथील दत्ता भाऊ भांदुर्गे आणि यांनी सदिच्छा भेट दिली व अनेक नवीन खेळ घेतले.हे संस्कार शिबिर दिनांक 30 एप्रिल पर्यंत सुरू राहणार असून रोज खाऊ वाटप, आरती करून मुलं शिबिराचा आनंद घेत आहेत.दि 27रोजी डॉ भंडारी यांनी मुलांचे दंत चिकित्सा शिबीर घेतले.रोजची मुलांची उपस्थिती 60असते तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे , असे आवाहन करण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२३/२०२६ अकोले दि. २४/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण शेळके, रा. मन्याळे**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. धोंडाबाई लक्ष्मण शेळके यांचा मृत्यू दि. ०१/०९/१९९७** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असुन त्यांच्या **आईच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण शेळके, रा. मन्याळे**, ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. धोंडाबाई लक्ष्मण शेळके यांचा मृत्यू दि. ०१/०९/१९९७** रोजी **मौजे मन्याळे** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय मन्याळे**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २४/०४/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**




## चैतन्य विद्यालयाचा विशेष प्राविण्य पुरस्काराने सन्मान

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयाचा गुरुवार दि:- २३ एप्रिल रोजी गणेश कला क्रीडा रंगमंच पुणे येथे झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५-२६ मध्ये विशेष प्राविण्य मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर उपसंचालक डॉक्टर गणपतराव मोरे पुणे जिल्हा माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.अशी माहिती विद्यालया च्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली . पुणे जिल्हा परिषद , माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान दरवर्षी राबविले जाते. या अभियानांतर्गत सर्व माध्यमिक शाळा भौतिक सुविधांनी सुसज्ज आहे की नाही हे पाहणे,शैक्षणिक गुणवत्ता वाढीस तपासणे व वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे, विविध शासकीय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो का हे तपासणे,विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणे,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम,कार्यक्रम यांची अंमल बजावणी होते का तसेच शिक्षकांची गुणवत्ता व विद्यार्थ्यां साठी योगदान आदी बाबी यात तपासल्या जातात.सलग दोन वर्षे चैतन्य विद्यालय या अभियानामध्ये जिल्ह्यात सातत्यपूर्ण कामगिरी करत आहे त्यामुळे यावर्षी विद्यालयास विशेष प्राविण्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

## छोटे विद्यार्थी ठरणार भावी पिढीचे 'समर्थरत्न' - सुरेश क्षीरसागर




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शैक्षणिक वर्ष २०२५/२०२६ मध्ये विविध स्पर्धा परीक्षांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळवणे ही शाळेसाठी अभिमानाची बाब असून, या यशामागे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांची वर्षभराची सातत्यपूर्ण मेहनत आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सुरेश क्षीरसागर यांनी केले. भविष्यात हेच विद्यार्थी जागतिक स्तरावर आपल्या पालकांचे तसेच संस्थेचे आणि शाळेचे नाव उज्ज्वल करतील आणि श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे "समर्थरत्न" म्हणून नावारूपाला येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, प्राथमिक विभागाच्या वतीने आयोजित विविध स्पर्धा परीक्षा प्राविण्य प्राप्त विद्यार्थी कौतुक सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी व शालेय समिती, प्राथमिक विभागाचे चेअरमन श्री. सुरेश क्षीरसागर यांनी भूषविले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. दीपक ओहोळ, माध्यमिक विभागाच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करत सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. इयत्ता पहिली ते चौथीच्या ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अहिल्यानगर महानगरपालिका आयोजित सांस्कृतिक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या धनगर नृत्याला मिळालेला द्वितीय क्रमांक हा अभिमानास्पद असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची सुरुवात संगीत शिक्षिका सौ. खणकर यांनी सादर केलेल्या सुरेल स्वागत गीताने झाली. यावेळी अध्यक्ष श्री. सुरेश क्षीरसागर व उपाध्यक्ष श्री. दीपक ओहोळ यांच्या हस्ते वर्षभरात विविध स्पर्धा परीक्षांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांचा तसेच मार्गदर्शक शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. इयत्ता चौथीतील कु. काव्या भालेराव हिने आपल्या मनोगतातून शाळा व शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तर पालक प्रतिनिधी सौ. अमृता कुलकर्णी यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी इंग्रजी माध्यम न निवडता मराठी माध्यमाच्या शाळेला दिलेल्या प्राधान्याचा अभिमान व्यक्त करत श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेबद्दल समाधान व्यक्त केले. शिक्षक मनोगतात गणेश पारधे यांनी संस्थेचे व मुख्याध्यापकांचे प्रोत्साहन मिळाल्यामुळे अध्यापनात अधिक सखोलता आणण्याची प्रेरणा मिळते, असे सांगितले. अध्यक्ष परिचय गीतांजली शेरकर यांनी करून दिला. यादिवचन पूजा खटावकर व सुप्रिया डबीर यांनी तर आभार प्रदर्शन विद्या नरवडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजली देशपांडे यांनी केले.

# गोमातेच्या रक्षणासाठी मकोका सारखा कठोर कायदा व्हावा!

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

राजाने गोमातेला राजमातेचा दर्जा दिला गोमातेच्या रक्षणासाठी कायदे केले मात्र आजही गोहत्या थांबलेली नाही गो हत्या थांबायचे असेल तर त्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा (मकोका) सारखा व्हावा. या व इतर मागण्यांचे निवेदन आमदार संग्राम जगताप यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना देण्यात आले. गोमातेच्या रक्षणासाठी शासनामार्फत विविध कायदे करण्यात आले राज्य मातेचा दर्जा देण्यात आला मात्र त्याची अंमलबजावणी कठोरपणे होत नसल्याने संघटित पद्धतीने गोमातेची तस्करी-हत्या आजही होत आहे हे चित्र उद्विग्न करणारे आहे. यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा अर्थात मकोकासारखा कठोर कायदा लोकसभेत संमत व्हावा. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा मिळावा, गोमातेचे संगोपन करणाऱ्यांना शासनामार्फत अनुदान देण्यात यावे, या सर्वांसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र गोमंत्रालय स्थापन करावे आदी मागण्यांचे २१ हजार नगरकरांच्या सह्यांचे निवेदन तहसीलदार व नायब तहसीलदार यांना देण्यात आले.




याप्रसंगी बापू ठाणगे यांनी गोमातेचे रक्षण करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असून यासाठी हिंदू धर्मात धर्मीय पुर्ण देशभर एकवटले असून आज एकाच वेळी काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंतच्या पाच हजार तहसील कार्यालयांमध्ये निवेदन देण्यात येत आहे. ही ऐतिहासिक घटना आहे. संत मंडळींच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशभरातून गो सेवक, गोप्रेमी मोठ्या संख्येने मागण्यांचे निवेदन देत आहेत. अहिल्यानगर मध्ये ही भिंगार, केडगाव, सावेडी व विविध उपनगरातील नागरिकांनी उस्फूर्तपणे निवेदनावर सह्या केल्या आहेत. शहराप्रमाणेच जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये ही अशाच प्रकारचे निवेदन एकाच वेळी देण्यात येत आहे अशी माहिती दिली. सावेडीतील दिनूभाऊ कुलकर्णी जॉगिंग ट्रॅक परिसरात सर्व गो प्रेमी सकाळी एकत्र जमले होते. भजनी मंडळाच्या वारकऱ्यांनी भजन संकीर्तन करून गो मातेच्या रक्षणासाठी आवाहन केले. भाजपा नेते महेंद्र भैय्या गंधे, सौ. मिनल गंधे, नगरसेवक ऋग्वेद गंधे यांनी सहभागी वारकरी संप्रदायातील विद्यार्थ्यांचे पूजन करून पदयात्रा मार्गस्थ झाली. यावेळी सर्व गोप्रेमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. कलानगर चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे समर्थ विद्यामंदिर वरून धर्मवीर चौक येथे पदयात्रा भजन संकीर्तन करत आली तेथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याला गोसेवकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला व तेथून सर्व गो सेवक तहसीलदार कार्यालयात जमा झाले. तहसीलदार, नायब तहसीलदार व अधिकाऱ्यांनी या पदयात्रेला कार्यालयाबाहेर सामोरे येत निवेदन स्वीकारले. याप्रसंगी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, महामहीम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तहसीलदार अहिल्यानगर यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या.

याप्रसंगी बापू ठाणगे, डॉ.अर्जुन घुले, दिनेश खंडेलवाल, गोकुळ आठरे, श्रीमती सुरेखा सांगळे, भरत बोरुडे,योगेश जामगावकर,भैय्या काशिद, संजय जोशी, राजन साळुंकै, अजित कटारिया, अजिंक्य गायकवाड, भारत शिंदे, अनिकेत शिंदे, माऊली गोशाळेचे संचालक माऊली व परीवार, ब्रह्मचैतन्य गोशाळेचे गौतम कराळे व सहकारी, गुंडेगाव येथील गोशाळेचे भापकर विविध गोशाळेचे संचालक विविध मंदिरांचे पुजारी, व्यापारी प्रतिनिधी अबाल वृद्ध व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसमत बस स्थानक : 'घोटाळ्यांचा पडदा फाडणारी' हाक!



**वसमत : (स. गांवकरी)**

शहरातील नव्या बस स्थानकाच्या कामावरून सध्या आरोप-प्रत्यारोपांची धुरळा उडत असताना, "तक्रारींमुळे विकास अडतो" हा दावा आता नागरिकांनी ठामपणे फेटाळून लावला आहे. उलट, या तक्रारी म्हणजे संभाव्य गैरव्यवहार, निकृष्ट दर्जा आणि नियमभंग उघड करण्यासाठीची 'सतर्कतेची घंटा' असल्याचे स्पष्ट होत आहे. बस स्थानकासारख्या कोट्यवधींच्या महत्त्वाच्या प्रकल्पात जर सुरुवातीपासूनच नियम धाब्यावर बसवले जात असतील, तर तो विकास नसून धोक्याची पायाभरणी ठरू शकतो, असा संतप्त सूर शहरात उमटू लागला आहे. "काम नियमांनुसार असेल तर चौकशीची भीती कशाला?" असा थेट सवाल नागरिक प्रशासनाला विचारत आहेत. या प्रकरणात समोर आलेले मुद्दे मात्र धक्कादायक आहेत.

नगर परिषदेकडून आवश्यक बांधकाम परवानगीच न घेता बस स्थानकाचे काम सुरू करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे. इतकेच नव्हे, तर कोणतीही अधिकृत मंजुरी नसताना हे काम राजरोसपणे पुढे ढकलले गेले, ही बाब अधिकच संशय वाढवणारी ठरत आहे. तसेच, बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या गौण खनिजांवर शासनाची अनिवार्य असलेली ई-रॉयल्टी न भरताच साहित्य वापरल्याचा आरोपही पुढे आला आहे. हा प्रकार खरा ठरल्यास तो थेट महसूल नियमांचे उल्लंघन ठरू शकतो. "कोट्यवधींच्या कामात नियमांना फाटा देऊन कोणाचा फायदा साधला जातोय?" असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. परिवहन विभागाच्या अभियंत्यांची भूमिकाही व कंत्रकदाराची संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. तक्रारींचे वेळेत निवारण करून काम पारदर्शकपणे मार्गी लावण्याऐवजी, प्रशासनाच्या ढिलाईमुळेच प्रकल्प रखडल्याची भावना तीव्र होत आहे. त्यामुळे विकास थांबवण्याचे खापर तक्रारदारांवर फोडण्याऐवजी, संबंधित यंत्रणेच्या निष्क्रियतेवर ठेवले जात आहे. वसमतकरांसाठी बस स्थानक हा केवळ प्रकल्प नसून दैनंदिन जीवनाशी निगडित गरज आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष चौकशी, दोषींवर कडक कारवाई, आणि दर्जेदार कामाची हमी मिळाल्याशिवाय हा प्रकल्प पुढे जाऊ नये, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.



ठाणे : महिला सक्षमीकरण व सबलीकरणाकडे एक पाऊल पुढे म्हणून महिला बचत गट व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर डोंबिवलीतील शुभम बँक्वेट हॉल घेण्यात आले. प्रसंगी कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कल्याण डोंबिवलीतील अनेक महिला बचत गटांना व्यवसाय करण्याकरिता हक्काचे व्यासपीठ तयार होत आहे. प्रसंगी लताताई पाटील, कविता गावंड, किरणताई मोंडकर, इंदिरा भोईर, शितल लोके, कल्पना पाटील, केतकी पोवार, स्वातीताई हिरवे सक्षम नारी सेवाभावी संस्था व बचत गट अध्यक्षा उपस्थित होत्या. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### जुन्नर तालुक्यातील उन्हाळी बाजरी फुलोऱ्यात

जुन्नर तालुका **(स. गांवकरी)** : जुन्नर तालुक्यातील जवळ पास सर्वच भागातील गावांमध्ये उन्हाळी बाजरीचे पीक सध्या फुलोऱ्यात आले आहे.तर आगात बाजरीचे पीक दाणेदार कणसांनी बहरले असून लवकरच वेटाळणी सुरु होणार आणि चांगले उत्पन्न देणारे असल्याने या परिसरातील शेतकरी दरवर्षी उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत. या वर्षी पाऊस चांगला पडल्याने माणिकडोह,,वडज, पिंपळगाव जोगा,नेतवड आणि चिल्हेवाडी धरणात मुबलक पाणी उपलब्ध आहे.सर्वच धरणातून उजवा व डावा कालवा तसेच मीना,कुकडी, पुष्पावती व मांडवी नदीला शाश्वत पाणी उपलब्ध होत असल्याने कालव्याने आणि नदीच्या किनाऱ्यावरची अनेक गावे उन्हाळ्यात बाजरीचे पीक घेत आहेत. उन्हाळ्यात स्वच्छ व दमदार हवामान असल्यामुळे बाजरीचे पीक जोरदार येत असून उत्पादनही मोठ्या प्रमाणात मिळत आहे. मात्र तापमानात अचानकपणे झालेल्या वाढीमुळे इतर पिकांप्रमाणे बाजरीवर परिणाम झाला आहे.तरी सुद्धा अनेक शेतकरी उन्हाळी बाजरीचे पीक मोठ्या प्रमाणात घेताना दिसतात उन्हाळी बाजरीची पेरणी केल्यानंतर शेतकऱ्यांना खुरपणी,खतपाणी आणि पक्ष्यांपासून निगा राखावी लागते पाणी मुबलक प्रमाणात मिळाल्यामुळे यंदा बाजरीचे पीक जोरदार आले आहे. बाजरीच्या कणसांचे आकार मोठे असून,दाणे टपोरे आहेत. यामुळे बाजरीच्या उत्पादनात मोठी वाढ होईल,असे बाजरी उत्पादक शेतकरी सांगत आहेत.



### पशु-पक्ष्यांचे हाल; पक्षीप्रेमी ओमकार अस्वले यांचे नागरिकांना आवाहन

अकोले **(स. गांवकरी)** : तालुक्यात सध्या उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला असून त्याचा सर्वाधिक फटका पशु-पक्ष्यांना बसत आहे. तापमानात झालेल्या झपाट्याने वाढीमुळे पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत, तर अन्नाचीही कमतरता जाणवत आहे. परिणामी अनेक पक्षी आणि भटक्या प्राण्यांची अवस्था बिकट झाली असून त्यांना अन्न-पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील वीरगाव येथील पक्षीप्रेमी ओमकार अस्वले यांनी पुढाकार घेत नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत आपल्या घरासमोर, गच्चीवर किंवा अंगणात पक्ष्यांसाठी पाण्याची छोटी भांडी ठेवावीत, तसेच शक्य असल्यास धान्य टाकून अन्नाची व्यवस्था करावी, असे त्यांनी सांगितले आहे. त्यांनी स्वतःही विविध ठिकाणी पाण्याची भांडी ठेवून तसेच पशु-पक्ष्यांसाठी अन्नाची सोय करून एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे परिसरात जनजागृती होत असून अनेक नागरिकही यात सहभागी होत आहेत. "उन्हाळा आपल्यासाठी त्रासदायक असला तरी पशु-पक्ष्यांसाठी तो जीवघेणा ठरू शकतो. थोडासा प्रयत्न केला तर आपण त्यांच्या जीवाला आधार देऊ शकतो," असे भावनिक आवाहन त्यांनी केले. सामाजिक बांधिलकी जपत प्रत्येकाने या उपक्रमात सहभागी होऊन पशु-पक्ष्यांचे प्राण वाचवण्यास हातभार लावावा, असेही त्यांनी केले आहे.



### आमदार श्यामभाऊ खोडे यांना 'दैनिक समर्थ गांवकरी'ची २०२६ डायरी भेट!

मंगरूळपीर **(स. गांवकरी)** : मंगरूळपीर तहसील कार्यालयामध्ये भारतीय जनता पार्टीचे आमदार श्यामभाऊ खोडे यांना दैनिक समर्थ गांवकरी मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे यांच्या हस्ते 'दैनिक समर्थ गांवकरी'ची २०२६ सालाची डायरी भेट देण्यात आली. यावेळी सौहार्दपूर्ण वातावरणात ही भेट पार पडली. दैनिक समर्थ गांवकरीच्या वतीने मान्यवरांना दरवर्षी स्मृतिचिन्ह स्वरूपात डायरी भेट देण्याची परंपरा जपली जात असून त्याच अनुषंगाने आमदार खोडे यांना ही डायरी प्रदान करण्यात आली. या प्रसंगी उपस्थितांनी दैनिक समर्थ गांवकरीच्या पत्रकारितेच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सूर्य कोपला उन्हाची तीव्रता अन शेतकऱ्यांची दमछाक

## तापमान ४० अंशांवर; भाजीपाला, फळ बागांचे नुकसान



**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यात तापमानाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढला असुन पारा ४० अंशांवर पोहोचल्याने रब्बी हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे.रणरणत्या उन्हामुळे शेतीकामे करताना शेतकऱ्यांची दमछाक होत असून,प्रखर उन्हाचा फटका भाजीपाला आणि फळबागांना बसत आहे.जुन्नर तालुक्यात सध्या कांदा आणि गहू तर उन्हाळी बाजरी देखील काही प्रमाणात काढणी सुरू असून कांदा व गहू काढणी तर उन्हाळी बाजरी काही फुलोऱ्यात,तर काही ठिकाणी कणसांना दाणे लागलेत तर काही काढणीच्या अंतिम टप्प्यात आहे. मात्र,वाढते तापमान आणि मजुरांच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत.दुपारी तापमान ४० अंश सेल्सिअस पर्यंत जाते हे जाळणारे तापमान आणि सायंकाळचे ढगाळ वातावरण यामुळे उकाडा वाढला आहे. अवकाळी पावसाच्या भीतीने काढलेले धान्य आणि चारा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी शेतकऱ्यांची कसरत सुरू आहे. अति उष्णतेमुळे घेवडा, कलिंगड,काकडी, टोमॅटो, पाले- भाज्या आणि तरकारी याशिवाय आंबा, चिक्कू,डाळिंब, आदिवासी भागातील रानमेवा करपू लागला आहे.

नवीन लागवड केलेली रोपे कोमेजल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.पाणी टंचाई आणि वाढत्या उष्णतेमुळे पोषक तत्त्वांच्या शोषणात अडथळा येत असल्यानेपिकांची वाढ खुंटली आहे. याचा थेट परिणाम बाजार पेठेतील पालेभाज्यांच्या दरांवर होत असून भाव वधारले आहेत.

# गोमातेला 'राष्ट्रमाता' दर्जा देण्याच्या मागणीसाठी भव्य मोर्चा!



**मंगरूळपीर : (स. गांवकरी)**

गो सन्मान आवाहन अभियान समिती, मंगरूळनाथ यांच्या वतीने मंगरूळपीर तहसील कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. गाईला राष्ट्रीय दर्जा अर्थात 'राष्ट्रमाता' घोषित करण्याच्या मागणीसाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते. घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष आपल्या मागण्यांकडे वेधले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे आमदार श्याम खोडे यांनी उपस्थितांना संबोधित करत, "गोमातेला राष्ट्रीय दर्जा मिळवून देण्यासाठी आमच्या पक्षाकडून प्रयत्न करण्यात येतील," असे आश्वासन दिले. मोर्च्यानंतर तहसील प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले असून, या मागणीबाबत लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# अपघातात नायब तहसीलदार ठार, तर दोन जखमी

**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**

बनकरफाटा जुन्नर मार्गावर गणपती फाट्याच्या पुढील एस कॉर्नरवर हायवाची व कारची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात जुन्नरचे निवडणूक नायब तहसीलदार ठार झाले असून, दोन महसुलाचे कर्मचारी जखमी झाले आहेत.सदर अपघात शनिवार दुपारी २.३० वा. दरम्यान बनकरफाटा जुन्नर मार्गावर पांगरीमाथ्याच्या मागे एस कॉर्नरवर झाला असून यात निवडणूक नायब तहसीलदार अनंता बनाजी गवारी वय-५२ वर्षे हे गंभीर जखमी होऊन ठार झाले आहेत तर विजय खोंडे वय-४८ वर्षे हे दोघे गंभीर जखमी झाले असून तुषार भीमराव कोरडे वय ३५ वर्षे सर्व रा.जुन्नर,ता. जुन्नर,जि. पुणे हे किरकोळ जखमी झाले आहेत. याबाबत स्थानिकांकडून मिळालेली माहिती अशी महसुल अधिकारी होंडा सिटी कार क्र.एम एच १४ के क्यु ०८१२ कार बनकरफाट्या कडुन जुन्नरच्या दिशेने जात होती त्याच वेळी पांगरी माथ्याकडुन बनकरफाट्याच्या दिशेने हायवा येत होता.एस कॉर्नर वर होंडा सिटी कारची हायवाची समोरा समोर धडक होऊन कारमधील गवारी व खोंडे गंभीर जखमी झाले.ही धडक इतकी भिषण होती की कार जी जुन्नरकडे चालली होती. तीचे फिरून परत बनकरफाटा बाजूला तोंड झाले होते. या अपघाताची माहिती मिळताच ओतूर चे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी किशोर बर्डे व इतरांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन स्थानिक नागरीकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रुग्णालयात पाठवले.तसेच अपघातग्रस्त वाहने मार्गावर बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.या अपघातातील गंभीर जखमी तसेच अपघातग्रस्त वाहने मार्गावर बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.या अपघातातील गंभीर जखमी गवारी यांना पुणे येथे उपचारासाठी नेत असताना ते मयत झाले.



# वाढत्या गुन्हेगारीला लगाम; HD सीसीटीव्ही बसवा

## डेटा दीर्घकाळ जतन करा; ओतूर पोलिसांचे आवाहन



**जुन्नर तालुका : (स. गांवकरी)**

ओतूर ता:-जुन्नर पोलीस स्टेशन हद्दीत वाढत्या चोरीच्या घटना व इतर गुन्हेगारी प्रकारांच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रामीण पोलिसांनी आता कडक भूमिका घेतली आहे. पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या संकल्पनेतून पुणे ग्रामीण हद्दीत १० हजार सी सी टीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्धार केला असल्याच्या अनुषंगाने ओतूर पोलिसांनी पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील, ग्रामपंचायत प्रशासन आणि नागरिकांना स्पष्ट शब्दांत सूचना दिल्या असून,सीसीटीव्ही यंत्रणे बाबत कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचा इशारा दिला आहे.ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी यासंदर्भात पत्राद्वारे निर्देश जारी केले आहेत.

पोलीस तपासात वारंवार असे आढळून आले आहे की, अनेक दुकाने,घरे,हॉटेल्स,बँक, ज्वेलर्स व पतसंस्थांमध्ये सीसी टीव्ही कॅमेरे बसवले असले तरी त्यांचा वापर अत्यंत अपुराआणि निष्काळजी पद्धतीने होत आहे. बहुतांश कॅमेरे केवळ आतील भागावर केंद्रित असल्याने बाहेरील भागातील रस्त्यावरील हालचालींची वाहतूक नोंद होत नाही.याशिवाय,ते अनेक ठिकाणी डेटा फक्त २ ते ३ दिवसां पुरताच साठवला जात असून,कॅमेरे व DVR यंत्रणा कार्यरत आहे की नाही याची कोणतीही कल्पना नाही पोलिस प्रशासनाच्या वतीने नियमित वाहन तपासणी करण्यात अडथळा निर्माण होत आहे

या गंभीर त्रुटींमुळे गुन्हे घडल्यानंतर तपासात मोठे अडथळे निर्माण होत असून, गुन्हेगारांना शोधण्यात विलंब होत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे कडक सूचना व अंमलबजावणी:प्रत्येक घर, दुकान व आस्थापनाबाहेर सार्वजनिक रस्ता स्पष्टपणे कॅमेऱ्यात येईल,अशी व्यवस्था करणे बंधनकारक,उच्च दर्जाचे (HD) सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे आवश्यक,किमान अधिक दिवसांचा डेटा साठवणूक कालावधी सुनिश्चित करणे,कॅमेरे व DVR यंत्रणेची नियमित तपासणी करून ती सतत कार्यरत ठेवणे अनिवार्य,या सूचनांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

"गुन्हे रोखण्यासाठी केवळ पोलीस यंत्रणा पुरेशी नाही,तर नागरिकांचे सक्रिय सहकार्य अत्यावश्यक आहे.सीसीटीव्ही ही केवळ औपचारिकता नसून ती गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रभावी साधन आहे,"असे स्पष्ट शब्दांत सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी नमूद केले आहे.

ओतूर पोलिसांच्या या कडक भूमिकेमुळे परिसरात शिस्त व सजगता वाढून गुन्हेगारीवर प्रभावी आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# इगतपुरीतील काळुस्ते आश्रमशाळेत खळबळ

- मुख्याध्यापकावर महिला शिक्षकांना त्रास व धमक्यांचे गंभीर आरोप!
- कीर्तनाच्या आडून दबाव टाकल्याची चर्चा; पूर्वीचे वाद पुन्हा चर्चेत!
- अध्यात्मिक बुरखा ओढलेला हा मुख्याध्यापक म्हणजेच दुसरा अशोक खरात!
- नाशिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाने आता तरी या प्रकरणांची दखल घेणार की नाही
- आदिवासी विकास मंत्री अशोक उईके व आमदार हिरामण खोसकर या प्रकरणात लक्ष घालणार का




**नाशिक : (स. गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील काळुस्ते येथील शासकीय आश्रम शाळेत मुख्याध्यापकाविरोधात गंभीर आरोप समोर आल्याने शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक कीर्तनाच्या माध्यमातून सकारात्मक व अध्यात्मिक प्रतिमा उभी करणाऱ्या या मुख्याध्यापकांच्या वर्तनावर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून महिला शिक्षकांना मानसिक त्रास देणे, धमक्या देणे तसेच दबाव टाकणे असे आरोप पुढे आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुख्याध्यापक "हा माझा तालुका, माझी जहागिरी" अशा शब्दांत सत्ता गाजवत विरोध करणाऱ्या शिक्षकांना "करेक्ट कार्यक्रम करतो" अशा स्वरूपाच्या धमक्या देत असल्याची चर्चा स्थानिक पातळीवर सुरू आहे. त्यामुळे शाळेतील शिक्षकवर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अधिक्षिकेची बाजू घेणाऱ्या शिक्षकांनाही लक्ष्य केले जात असल्याचे समजते. या मुख्याध्यापकावर यापूर्वीही सोनखुर्द व तळोदा प्रकल्पांमध्ये विनयभंगासारखे गंभीर आरोप झाले होते. तसेच मुतखेल (राजूर) येथे एका महिला शिक्षकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचाही आरोप करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर काळुस्ते येथील नव्याने समोर आलेले आरोप अधिक गंभीर मानले जात असून, जुन्या प्रकरणांचीही पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान, या प्रकरणात शाळेतील अधिक्षिकेवरही दबाव टाकण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मारहाण घडवून आणण्याचा कट रचल्याचा आरोप करत संबंधित अधिक्षिकेला निलंबित करण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा आहे. मानसिक तणावामुळे संबंधित अधिक्षिकेने बदली घेतल्याचेही समजते. तसेच काही शिक्षकांना "घरचा रस्ता दाखवू" असा दम देण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

या सर्व घडामोडींमुळे आदिवासी विकास विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून दोन समित्यांनी अहवाल देऊनही संबंधित मुख्याध्यापकावर कारवाई का झाली नाही, याबाबतही चर्चा रंगू लागली आहे. इगतपुरी तालुक्यात मागील काही महिन्यांत अशाच प्रकारच्या घटना घडल्याचेही सांगितले जात आहे. या प्रकरणात आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार हिरामण खोसकर तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने लक्ष घालून सखोल चौकशी करावी, अशी मागणी स्थानिक नागरिक, पालक आणि शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे. संबंधित मुख्याध्यापकाची तात्काळ बदली करण्यात यावी, अशीही मागणी जोर धरत आहे. एकूणच, काळुस्ते आश्रमशाळेतील हे प्रकरण आता गंभीर वळणावर पोहोचले असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे




### नर्सिंग स्कूल येथे जागतिक हिवताप दिन उत्साहात साजरा

■ "डास नियंत्रण, स्वच्छता आणि जनसहभागातून हिवतापमुक्त समाजाकडे वाटचाल"

अहिल्यानगर (स. गांवकरी) : दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस "जागतिक हिवताप दिन" म्हणून साजरा केला जातो. हिवताप (मलेरिया) हा डासांद्वारे पसरणारा गंभीर संसर्गजन्य रोग असून त्याच्या प्रतिबंधासाठी जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर यंदाचा जागतिक हिवताप दिन विविध जनजागृती उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी "हिवताप दूरीकरणासाठी कटिबद्ध, आता हे शक्य आहे... आता हे केलेच पाहिजे!" या घोषवाक्याखाली हिवताप विभाग अहिल्यानगर शहर व अहिल्यानगर महानगरपालिका, आरोग्य विभाग यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून शहरातील नागरिकांमध्ये डास नियंत्रण व हिवताप प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. नागरिकांनी आपल्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळणे, मच्छरदाणीचा वापर करणे तसेच ताप आल्यास त्वरित रक्त तपासणी करून घेणे, असे महत्त्वपूर्ण आवाहन यावेळी करण्यात आले.

### गॅस सिलिंडर बुकिंगच्या नियमात पुन्हा बदल होणार?



अहिल्यानगर (स. गांवकरी) : देशातील तीन ऑइल कंपनी इंडेन, भारत गॅस आणि एचपी गॅसच्या नव्या नियमाबाबत चर्चा सुरू झाली आहे. नवा नियम लागू झाल्यास महिन्याला मिळणारा गॅस सिलिंडर डिलिव्हरी करण्याच्या पद्धतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वांना सिलिंडरच्या नियमाबाबत अलर्ट राहावे लागणार आहे. मे महिन्यात गॅसच्या किंमती आणि धोरणात बदल होऊ शकतो. महिन्याच्या पहिल्या तारखेपासून गॅसच्या दरात बदल होऊ शकतो. मे महिन्यापासून सिलिंडर बुकिंगचा अवधी वाढवण्याची शक्यता व्यक्ती केली आहे. नव्या नियमानुसार, १ मे पासून एक सिलिंडरनंतरचा बुकिंगचा कालावधी बदलण्याची शक्यता आहे. ओटीपी आधारित डिलिव्हरी सिस्टम देखील कायमस्वरुपी केली जाऊ शकते. नव्या महिन्यापासून सिलिंडर डिलिव्हरीसाठी नोंदणीकृत मोबाइल नंबरवर ओटीपी मिळेल. या नियमानुसार, तुम्ही ओटीपी दिला नाही, तर तुम्हाला सिलिंडर मिळणार नाही. कच्च्या तेलाचा पुरवठा रोखल्यानंतर सरकारी तेल कंपन्या आता अमेरिकेकडून अतिरिक्त एलपीजी खरेदी करत आहे. त्यानंतर या गॅस सिलिंडरची डिलिव्हरी जून-जुलै महिन्यापासून सुरू होईल. भारताला दररोज किमान ८०००० टन एलपीजीची गरज भासते. तर देशात सध्या ४६००० टन प्रतिदिन एलपीजीचे उत्पादन होते. तरीही भारताला आयातीवर अवलंबून राहावं लागतं. भारत आधी ९० टक्के एलपीजी आखाती देशातून खरेदी करत होता. परंतु रणनीती बदलल्यानंतर स्वयंपाकाच्या गॅसची आयात इतर देशातून वाढवण्यात आली. भारताने आखाती देशाव्यतिरिक्त अमेरिका, नॉर्वे, कॅनडा, अल्जारिया आणि रशियाकडून एलपीजी खरेदी सुरू करण्यात आली आहे. भारत आधी १० देशातून एलपीजी आयात करत होता. आता १५ देशातून आयात केली जात आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, जवळपास ८ लाख टन एलपीजी आयात करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी १० जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतात पोहोचले आहेत. यात ९ जहाज स्वयंपाकाच्या गॅसचे आहेत.

### धारदार शस्त्राने हल्ला; एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नागापूर परिसरात हळदीच्या कार्यक्रमात झालेल्या वादातून तीन जणांनी चांगलाच गोंधळ घातला. दगडाने आणि धारदार शस्त्राने हल्ला केल्याने एक महिला जखमी झाली असून वाहन व दरवाजाची तोडफोड करून नुकसान केले आहे. जयश्री बाबासाहेब भाकरे असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी ब्रिजेश राजेंद्र सुर्यनारायण (वय २६, रा. चेतना कॉलनी, साईराजनगर) यांनी गेल्या शनिवारी (२५ एप्रिल) रात्री दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संग्राम बापु कदम, किरण ऊर्फ डॉरिमॉन अशोक साळवे व बंटी शिंदे (पूर्ण नाव माहिती नाही, सर्व रा. नागापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. फिर्यादी ब्रिजेश सूर्यनारायण हे नागापूर भागात आपल्या चुलत मेव्हणा रमेश भाकरे यांच्या घरी हळदीच्या कार्यक्रमासाठी गेले होते. रात्रीच्या वेळी ध्वनिक्षेपकावर गाणी सुरू असताना संशयित आरोपींशी वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. संशयित आरोपींनी संगनमत करून शिवीगाळ करत दगड व धारदार शस्त्राने केलेल्या हल्ल्यात महिला जखमी झाली.

# 'मिशन भरारी'मुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचे आभाळाशी नाते

**'सायन्स सोल्जर्स' घडवण्याचा संकल्प- उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे**

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'मिशन भरारी' या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत निवड झालेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या इस्रो अभ्यासदौऱ्यास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज, दि. २७ एप्रिल, २०२६ रोजी हिरवा झेंडा दाखविण्यात आला. हा शुभेच्छा समारंभ जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, "मिशन भरारी' हा केवळ उपक्रम नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा एक व्यापक प्रयत्न आहे. आपल्या मातीतल्या लेकरांना आभाळाशी नाते जोडण्याची ही संधी आहे. अल्पावधीत, केवळ तीन महिन्यांत हा उपक्रम प्रत्यक्षात उतरविणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे. पूर्वी सरकारी कामांना विलंब होत असल्याची धारणा होती; मात्र आज शासनाच्या कार्यपद्धतीत वेग आणि परिणामकारकता दिसून येते."

ते पुढे म्हणाले, "या स्पर्धेतून निवड झालेले ५९ विद्यार्थी हे माझ्या दृष्टीने 'सायन्स सोल्जर्स' आहेत. जसे सीमेवरील जवान देशाचे रक्षण करतात, तसे हे विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भविष्य घडवतील. विज्ञान म्हणजे केवळ माहिती नसून जिज्ञासा आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती आहे. 'का?' हा प्रश्न विचारण्याची सवय जोपासा. हीच सवय तुम्हाला मोठ्या शोधांपर्यंत घेऊन जाईल."

"ही सहल केवळ पर्यटन नसून प्रत्यक्ष विज्ञानाचा अनुभव देणारी आहे. विक्रम साराभाई अवकाश केंद्र, थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशन यांसारख्या ठिकाणी भेट देताना मिळणारा अनुभव तुमच्या आयुष्याला नवी दिशा देईल. शाळेतील ३६५ दिवसांच्या शिक्षणाइतकेच हे काही दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत," असेही त्यांनी नमूद केले. तसेच, "ग्रामीण भागात अपार क्षमता आहे. योग्य संधी आणि व्यासपीठ दिल्यास ही मुलेही आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेऊ शकतात. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून ए. पी. जे. अब्दुल कलाम किंवा कल्पना चावला यांच्यासारखे शास्त्रज्ञ घडतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि देशासाठी कार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले, 'मिशन भरारी' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक ठरणारा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या वैज्ञानिक संस्थांचा प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांच्या विचारविश्वाला व्यापकता देण्याचा हा प्रयत्न आहे. या अभ्यासदौऱ्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात निश्चितच वाढ होईल, तसेच त्यांच्या मनात विज्ञान, संशोधन आणि नवतंत्रज्ञानाबाबत जिज्ञासा निर्माण होईल. पाठ्यपुस्तकातील ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळेल. भविष्यात हेच विद्यार्थी विविध क्षेत्रात यश संपादन करून समाज आणि देशाच्या विकासात मोलाचे योगदान देतील, असा आम्हाला विश्वास आहे," असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास विधान परिषद सदस्य निरंजन डावकरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विधान सभा सदस्य किसन कथोरे, डॉ. बालाजी किणीकर, शांताराम मोरे, राजेश मोरे, पालक सचिव ठाणे नवीन सोना, मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव, अपर जिल्हाधिकारी हरिचंद्र बा. पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे, प्रमोद काळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, कार्यक्रम अधिकारी संजय बागुल तसेच विविध मान्यवर व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



## महात्मा गांधी विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची निवड

मंचर (ता. आंबेगाव) : (स. गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत इयत्ता नववीसाठी दरवर्षी रयत ऑलिंपियाड परीक्षा आयोजित केली जाते. ही परीक्षा फेब्रुवारी महिन्यात घेण्यात येते. या परीक्षेच्या पहिल्या टप्प्यात पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना दुसऱ्या टप्प्यात शोध प्रकल्प सादर करावा लागतो. यावर्षी महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, मंचर येथील इयत्ता नववीतील कु. तेजल जालिंदर शिंदे व कु. मधुरा महेंद्र एरंडे या दोन विद्यार्थिनींची शोध प्रकल्पासाठी निवड झाली आहे. या विद्यार्थिनींना विभाग प्रमुख सौ. स्मिता बांगर तसेच मार्गदर्शक शिक्षक श्री. संतोष दरेकर, श्री. निवृत्ती बांगर, सौ. सीमा बाणखेले व श्रीम. प्रज्ञा खोडदे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच विद्यालयाचे प्राचार्य नितीन बाणखेले, उपमुख्याध्यापक महेंद्र कारंडे, पर्यवेक्षक दिलीप बच्चे, दशरथ काळे यांची प्रेरणा लाभली. ऑलिंपियाडमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. २८ व २९ एप्रिल २०२६ रोजी कुंभोज येथे मार्गदर्शनपर शिबिर आयोजित करण्यात आले असून या दोन दिवसांच्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना शोध प्रकल्प कसा तयार करावा याबाबत तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन मिळणार आहे. या यशाबद्दल विद्यार्थिनींचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विविध विभागांसह कार्यकारिणी बरखास्त

पारनेर : (स. गांवकरी)

■ तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे यांची माहिती

■ जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची पुनर्बांधणी




पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार )विविध विभागांसह कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असल्याची घोषणा पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे यांनी पत्रकार परिषदेत केली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे,जिल्हाध्यक्ष, खासदार नीलेश लंके यांच्या सूचनेनुसार कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असल्याचे तरटे यांनी स्पष्ट केले.यावेळी शिक्षक नेते, बाजार समितीचे संचालक रा.या. औटी,माजी सभापती किसनराव रासकर, कॉंग्रेसचे नेते शिवाजीराव जाधव उपस्थित होते. आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची पुनर्बांधणी करणे, नवीन कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असल्याचे तरटे म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका,शहर कार्यकारिणसह युवक, महिला, किसान सेल, डॉक्टर सेल,विधी सेल,ओबीसी सेल, अल्पसंख्याक सेल,अपंग सेल, सांस्कृतिक सेल आदी विभागांच्या अध्यक्षांसह कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असल्याचे तरटे यांनी सांगितले. लवकरच खासदार नीलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील जिल्हा परिषद गटनिहाय बैठका घेऊन पक्षाचे संघटन अधिक मजबूत करण्यासाठी बैठकांमध्ये चर्चा होणार आहे. खासदार लंके यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या बैठकांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांमध्ये अधिक उत्साह निर्माण होईल.या बैठकांमध्ये पक्षाच्या तालुका कार्यकारिणीसह विविध विभागांचे अध्यक्ष, कार्यकारिणी निवडण्याबाबत चर्चा होणार असल्याचे तरटे यांनी स्पष्ट केले.

आठ वर्षांपूर्वी,२०१८ साली आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार ) तालुकाध्यक्ष पदाची धुरा सांभाळली.त्यानंतर सलग १५ वर्षे हुलकावणी देणारी आमदारकी पक्षाकडे आली.तत्कालिन आमदार व विद्यमान खासदार नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा बँकेचे संचालक पद यासह विविध निवडणुकांमध्ये यश मिळवले.याचे निश्चितच समाधान आहे.

**-बाबासाहेब तरटे, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)**

## राजकीय खेळी समजली म्हणूनच खासदार झालो!

**खा. नीलेश लंके यांचा डॉ. सुजय विखे यांच्यावर पलटवार**

पारनेर : (स. गांवकरी)




नीलेश लंके प्रतिष्ठानच्या पाडळी रांजणगाव शाखेच्या उदघाटनप्रसंगी खासदार नीलेश लंके यांनी राजकीय परिस्थितीवर भाष्य करत विरोधकांवर जोरदार टीका केली. "मी एक गुगली टाकली आणि लगेच रिप्लाय आला. राजकारणात अशीच खेळी समजून घेतली पाहिजे. त्यामुळेच मी आमदार आणि खासदार होऊ शकलो," असे ते म्हणाले. कर्जुले हर्या येथे २०२९ ची विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा केल्यानंतर माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना लंके यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. "लोकांनी माझ्यावर विश्वास ठेवून निवडून दिले आहे. श्रीगोंदा, कर्जत-जामखेड, राहुरी, पाथर्डी, नगर शहर, नगर तालुका, पारनेर या मतदारसंघांना न्याय देण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. मी त्यासाठी पूर्णतः सक्षम आहे," असे त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना ते म्हणाले, "राजकारणात कधी कधी जाणीवपूर्वक विधान करून प्रतिक्रिया पाहावी लागते. कोण आक्रमक होतो, कोण शांत राहतो, यावरून पुढील रणनीती ठरवता येते. प्रत्येक टीकेला उत्तर देत बसलो तर कामासाठी वेळ मिळणार नाही. त्यामुळे संयम राखणे अत्यंत गरजेचे आहे." कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना लंके यांनी "आज सत्ता नसली तरी खचून जाण्याचे कारण नाही. राजकारण प्रवाही आहे. आज विरोधात असलेले उद्या सत्तेत येऊ शकतात. लढा आणि संयम ठेवा," असा संदेश दिला. त्यांनी शरद पवार यांच्या दीर्घ राजकीय कारकिर्दीचा उल्लेख करत, "पवार साहेब अनेक वर्षे विरोधात राहूनही कधी डगमगले नाहीत," असे सांगितले.

विरोधकांवर टीका करताना लंके म्हणाले, "काहींना वाटते मी मावळलो आहे; मात्र ज्यांच्या जोरावर तुम्ही उड्या मारता, त्यांनाच घरी बसवण्याची ताकद माझ्यात आहे. डबक्यातल्या बेडकाला वाटते तेच जग आहे; पण बाहेरचे जग खूप मोठे आहे." कार्यकर्त्यांवरील अन्यायाचा उल्लेख करत त्यांनी नाराजी व्यक्त केली. "भोळ्या-भाबड्या कार्यकर्त्यांना त्रास देऊ नये. ज्यांनी काम केले नाही त्यांनी लोकांना फसवू नये," असे त्यांनी सांगितले. तसेच "मी साधा माणूस आहे. अडचणी येतात, पण संयम ठेवून पुढे गेल्यास यश मिळते," असेही ते म्हणाले. या कार्यक्रमास बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी मारुती रेपाळे, सुदाम पवार, रा. या. औटी, अर्जुन भालेकर, डॉ. बाळासाहेब कावरे, कारभारी पोटघन, सचिन पठारे, सतीश भालेकर, लाला भोंडवे, प्रकाश गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

## नदीपात्रात स्थानिकच्या वाळू माफियाची सरंजामशाहीशी

बिलोली : (स. गांवकरी)



बिलोली तालुक्यातील मौ. हुनगुंदा येथे वाळू माफियांचा धुमाकूळ, मागील काळात शासकीय वाळू डेपोतील जमा असलेला तब्बल १५ ८१ ब्रास वाळूसाठा चोरी केल्यानंतर पुन्हा त्या ठिकाण्यासह नदीपात्रात ठिकठिकाणी हजारो ब्रास वाळूचा साठा जमाविला आहे. आणि यासह दररोज नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करून अनेक ट्रॅक्टर व हायवाच्या सह्याने धर्माबाद मार्गे तेलंगणात वाहतूक केली जात आहे. गेल्या काही दिवसापासून तालुक्यातील हुंनगुंदा मांजरा नदीपात्रात वाळू माफियांची सरंजामशाहीशी चालू आहे. राजकीय, आर्थिक बलाचा वापर करून वाळू उपस्याचा कसलाही परवाना नसताना स्थानिक प्रशासनाच्या मूक संमतीने मांजरा नदीपात्रातून दररोज रात्रीला ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत पर्यंत अनेक हायवा व ट्रॅक्टरच्या सह्याने हजारो ब्रास वाळूचा अवैध उपसा करून नदीपात्रासह विविध ठिकाणी वाळूचे अवैध साठे जमविले आहे. आणि जमेल त्या पद्धतीने चढ्या भावाने विक्रीसाठी धर्माबाद मार्गे परराज्यात वाळूची अवैध वाहतूक केली जाते. यापूर्वी याच वाळू चोरट्यांनी नदीपात्रा लगत शासकीय डेपोत जमा असलेला तब्बल १५८१ ब्रास वाळूसाठा साफ केला आहे. पुन्हा त्याच ठिकाणी अवैध मार्गाने शेकडो ब्रास वाळूचा साठा जमविला आहे. त्या चोरी संबंधात प्रशासन दरबारी अनेक तक्रारी दाखल करण्यात आल्या.

# निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित शिबिरात १७५ जणांनी केले रक्तदान

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



हृदयात करुणा, प्रेम आणि एकात्मतेची दिव्य जाणीव जागृत झाली की, मनुष्य आपल्या संकुचित स्वार्थांच्या पलीकडे जाऊन संपूर्ण सृष्टीच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनतो. परोपकार, करुणा आणि परमार्थ या उदात्त मूल्यांनी अधोरेखित झालेला हा दिवस उच्च मानवी मूल्यांची जाणीव अधोरेखित करणारा ठरला; 'मानवाने मानवावर प्रेम करावे, एकमेकांचे आधार बनावे' हा संदेश शब्दांच्या पलीकडे जाऊन जनमानसात ठळकपणे रुजला.

'मानव एकता दिवस' २४ एप्रिल रोजी युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिताजी यांच्या सान्निध्यात, दिल्लीतील ग्राउंड क्र. ८ येथे अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. याचबरोबर देशभरातील हजारो सत्संग केंद्रांवरही हा दिवस श्रद्धा व समर्पणभावाने यशस्वीरीत्या पार पडला. हे केवळ एक आयोजन नव्हते, तर प्रेम, सद्भावना आणि निष्काम सेवेचे प्रभावी प्रतिबिंब म्हणून ते सर्वत्र उमटले. संत निरंकारी मंडळाचे सचिव आ.श्री जोगिंदर सुखीजा यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज देशभरातील सुमारे २००हून अधिक ठिकाणी रक्तदान शिबिरांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या माध्यमातून जवळपास ४०,००० युनिट रक्त संकलित करण्यात आले, जे निष्काम सेवा, परोपकार आणि मानवतेप्रती असलेल्या समर्पणाची प्रभावी अभिव्यक्ती ठरले. युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांच्या स्मृतीत साजरा होणारा हा दिवस वर्षभर चालणाऱ्या सेवा उपक्रमांचा प्रारंभबिंदू आहे. याअंतर्गत देशभरात रक्तदान शिबिरांच्या शृंखलेद्वारे सुमारे ७०५ ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित केली जाणार असून, करुणा आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यामागे आहे. विशेष म्हणजे, रक्तदानाची ही पावन परंपरा मागील चार दशकांपासून अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत ९,१७४ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,२३० युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेप्रती निरंकारी मिशनची अटळ बांधिलकी यामुळे अधोरेखित होते. मानव एकता दिवसानिमित्त ब्रांच अहिल्यानगर येथे आयोजित रक्तदान शिबिराचे उदघाट्न डॉ. प्रफुल्ल चौधरी व डॉ. कैलास झालानी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले, यावेळी झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी, आनंद कृष्णानी, विठ्ठल खाडे तसेच अनेक मान्यवर व सेवादल सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते. शिबिरात जिल्हा रुग्णालय रक्तपेढी तील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक आरोग्य तपासणी करून सुरक्षित, सुव्यवस्थित आणि प्रभावी पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. या उपक्रमातून १७५ इतक्या रक्तयुनिटचे संकलन करण्यात आले,रक्तदान करणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या ही लक्षणीय होती तसेच अनेक जणांनी पहिल्यांदाच रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत मानवसेवेचे कर्तव्य पार पाडले.संपूर्ण आयोजनात स्वच्छता, सतर्कता आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा अवलंब करण्याचे आणि आपली ऊर्जा समाजसेवेसाठी वापरण्याचे आवाहन केले. बाबा हरदेव सिंह जी यांनी "रक्त नाड्यांतून वाहावे, नाल्यांतून नव्हे" हा संदेश देत सेवेला जीवनाचा अविभाज्य घटक बनवले. हाच सेवा-संदेश सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आजही प्रभावीपणे पुढे नेला जात आहे.

# चोंडीच्या नियोजनबद्ध विकासातून पर्यटनाला चालना मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : पर्यटकांसाठी दर्जेदार सुविधा उभाराव्यात : श्री क्षेत्र चोंडी विकास आराखडा आढावा बैठक

मुंबई : (स. गांवकरी)




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा आदर्श कायम स्मरणात राहणार आहे. त्यांच्या जीवनकार्यातून नवीन पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने चौंडी गावाचा विकास करण्याच्या दृष्टीने अनेक विकासकामे हाती घेण्यात आलेली आहेत. चोंडीचा विकास सर्वसमावेशक व नियोजनबद्ध पद्धतीने करत दर्जेदार सुविधांच्या माध्यमातून पर्यटनास चालना देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळ, चोंडी येथील जतन, संवर्धन व विकास आराखड्यासंदर्भात बैठक वर्षा निवासस्थान येथे झाली. या बैठकीस विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी, नियोजन विभागाच्या शैला ए, जलसंपदा विभागाचे सचिव डॉ. संजय बेलसरे, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, चोंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाच्या सर्वांगीण विकासासाठी ६८१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, या प्रकल्पांतर्गत स्मारक परिसरात भव्य पुतळा, सुशोभित उद्यान, नदीकाठाचा विकास, आधुनिक संग्रहालय, ओपन एअर थिएटर आणि पर्यटन सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. स्मारक परिसरात कायमस्वरूपी पाण्याची उपलब्धता करण्यासाठी जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात यावा. तसेच हरित क्षेत्र आणि मोकळ्या जागांचा समतोल राखत परिसराचे सौंदर्यीकरण करावे.

बुडीत बंधाऱ्यांऐवजी 'बॅरेज' उभारण्याबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करावी. मंदिर परिसरातील भूसंपादन जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करावे. प्रकल्पातील काही सुविधा उभारणी व देखभालीसाठी खासगी भागीदारी (पीपीपी मॉडेल) आणण्याबाबत सकारात्मक विचार सुरू असून, यामुळे पर्यटन सुविधा अधिक दर्जेदार, कार्यक्षम व दीर्घकालीन टिकाऊ पद्धतीने विकसित करता येणार असल्याचे श्री फडणवीस म्हणाले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत 360 कोटींच्या रस्ते प्रकल्पातील दोन कामांसाठी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक जागेच्या सीमारेषा निश्चित करण्यासाठी वन, सार्वजनिक बांधकाम, जलसिंचन विभाग आणि ग्रामपंचायत यांनी संयुक्त मोजणी केली असून सीमारेषा निश्चित करण्यात आल्या आहेत. चोंडी येथील स्मारकाचा विकास नियोजनबद्ध पद्धतीने आणि टप्प्याटप्प्याने केला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे म्हणाले, चोंडी विकास आराखड्यात इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांचा समन्वय साधत स्थानिक विकास व रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा शासनाचा मानस आहे. याशिवाय परिसराचे सौंदर्यीकरण, जलसौंदर्य, हरित क्षेत्र, तसेच पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करून चोंडीला आकर्षक पर्यटनस्थळ म्हणून उभारण्याचे नियोजन आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## एसटी बस, वऱ्हाडाची स्कूल बस यांच्यात भीषण अपघात

■ संदेश कार्ले यांची रुग्णांना तातडीची मदत

अहिल्यानगर (स. गांवकरी) : वाळुंज बायपास परिसरात आज दुपारी सुमारे चारच्या सुमारास एसटी बस आणि वऱ्हाडाची स्कूल बस यांच्यात भीषण अपघात झाला. भरधाव वेगात येणाऱ्या एसटी बसने स्कूल बसला जोराची धडक दिल्याने ९ जण जखमी झाले असून काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वऱ्हाड चिंचोडी पाटील येथील नागरिक लग्न समारंभ आटोपून परत येत असताना वाळुंज उड्डाणपुलाखाली हा अपघात घडला. धडकेचा आवाज इतका जोरदार होता की परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्वतः पुढाकार घेत चार जखमींना आपल्या वाहनातून जवळील खाजगी रुग्णालयात दाखल केले. उर्वरित पाच जखमींना ॲम्ब्युलन्सद्वारे उपचारासाठी हलविण्यात आले. स्थानिक नागरिक आणि मदतकार्यकर्त्यांनी जखमींना बाहेर काढून तातडीने मदत केली. संदेश कार्ले हे नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना मदतीचा हात देत असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला असून अपघाताचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.हजारे मेजर सरपंच शरद पवार वाळुंज ग्रामस्थ यांनी मदत केली.



## फोटोग्राफर रंधवे यांच्या कुटुंबाला मित्रांची आर्थिक मदत

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव (मुंडेकरवाडी) येथील रहिवासी फोटोग्राफर संदीप विलास रंधवे यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावल्याने उद्भवलेल्या परिस्थितीत त्यांच्या मित्रांनी एकत्र येत आर्थिक मदत करून कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. अत्यंत गरिब कुटुंबातून आलेल्या संदीप रंधवे यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर रोजगाराच्या शोधात फोटोग्राफी व्यवसायाची निवड केली होती. साखरपुडा, लग्नसमारंभ, वाढदिवस यांसारख्या हंगामी कामांवर त्यांचा उदरनिर्वाह चालत होता. मर्यादित उत्पन्न आणि उधारीच्या परिस्थितीतही त्यांनी व्यवसाय सुरू ठेवला; मात्र अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. कुटुंबात अन्य कमावता व्यक्ती नसल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. तेजस्विनी, गायत्री आणि यश ही तिन्ही मुले श्रीगोंदा येथे शिक्षण घेत असून त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक सहाय्याची गरज आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन काष्टी व परिसरातील फोटोग्राफर मित्रांनी एकत्र येत आर्थिक मदत जमा करून ती रंधवे कुटुंबाला दिली. या मदतीने सर्व प्रश्न सुटणार नसले तरी कुटुंबाला दिलासा मिळाला आहे. तसेच दानशूर व्यक्ती व शिक्षण संस्थांनी मुलांच्या शिक्षणाचा खर्च उचलावा, तसेच पत्नी नीलम रंधवे यांना त्यांच्या पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मदतीसाठी इच्छुकांनी सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी फोटोग्राफर विकास कोकाटे, सुनील भोयटे, बच्चन गोंटे, बापू जगताप, प्रशांत कोकाटे आदींनी घरी भेट देत संघटनेच्या वतीने मदत सुपूर्द केली.

## उष्माघाताचा पहिला बळी; महिलेचा शेतात काम करताना मृत्यू!



जुन्नर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे उष्माघाताची पहिली दुर्दैवी घटना समोर आली आहे. निमगाव सावा येथील सौ. रुपाली भाऊ गाडगे यांचे दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:४५ वाजता दुर्दैवी निधन झाले. मिळालेल्या माहितीनुसार, त्या शेतात खुरपणीचे काम करत असताना अचानक उष्माघाताचा त्रास झाल्याने त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. भर उन्हात विशेषतः दुपारी १२ ते ४ या वेळेत श्रमाची कामे टाळावीत, पुरेसे पाणी प्यावे, डोक्यावर रुमाल किंवा टोपीचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चिखली-वासुर्णा मार्गावरील चेकडॅम दुरुस्तीच्या नावाखाली 'लीपापोती'



डांग, गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यात सरकारी कामांमध्ये होत असलेल्या अनियमितता आणि हलगर्जीपणामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. अलीकडेच चिखली ते वासुर्णा मार्गावर असलेल्या एका महत्त्वाच्या चेकडॅमच्या दुरुस्तीच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार आणि समोर आलेल्या छायाचित्रांवरून असे दिसून येते की, चेकडॅम मजबूत करण्याऐवजी प्रशासन आणि ठेकेदारांकडून केवळ वरवरचे प्लास्टर करून काम पूर्ण केल्याचे दाखवले जात आहे. जुन्या आणि जीर्ण झालेल्या संरचनेवर सिमेंटचा पातळ थर देऊन त्याला नव्यासारखे रूप देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, येत्या पावसाळ्यात पाण्याच्या तीव्र प्रवाहाला हा चेकडॅम तोंड देऊ शकेल का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. डांगसारख्या डोंगराळ भागात चेकडॅम हे पाणी साठवण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. मात्र, दुरुस्तीच्या नावाखाली होत असलेली ही 'लीपापोती' ही सरकारी निधीची उधळपट्टी असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होऊन योग्य दर्जाचे मजबुतीकरण करण्यात आले नाही, तर साध्या पावसातही हा चेकडॅम पुन्हा नुकसानग्रस्त होण्याची शक्यता आहे. यामुळे शेतकरी आणि पशुपालकांना मोठा फटका बसू शकतो.

# नवीन 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' भारतात लॉन्च

पुणे : (स. गांवकरी)



बीएमडब्ल्यू मोटोराड इंडियाने आज भारतीय बाजारपेठेत नवीन 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' अधिकृतपणे लॉंच केली आहे. बहुप्रतिक्षित असलेली ही मोटारसायकल बीएमडब्ल्यू मोटोराड इंडियाच्या सर्व डीलर नेटवर्कवर बुकिंगसाठी उपलब्ध असून, जून २०२६ पासून तिचे वितरण सुरू होईल. बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएसची रचना जर्मनीमध्ये बीएमडब्ल्यू मोटोराडद्वारे करण्यात आली असून तिचे उत्पादन भारतात स्थानिक पातळीवर केले जाईल. 'जीएस' म्हणजे रस्ता असो वा खडतर मार्ग, सर्व ठिकाणी साथ देणारा एक "सर्वोत्तम सोबती". बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस खऱ्या अर्थाने जीएसचा मूळ गाभा प्रतिबिंबित करते - मोटारसायकलवर स्वार व्हा, थ्रॉटल फिरवा आणि पूर्ण नियंत्रण व जास्तीत जास्त आत्मविश्वासासह प्रवासाचा आनंद घ्या. याप्रसंगी बोलताना बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. हरदीप सिंग ब्रार म्हणाले, "नवीन बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस ही साहसी रायडर्सच्या नवीन पिढीसाठी तयार करण्यात आली असून, याद्वारे जीएस वारशाचा एक धाडसी नवा अध्याय सुरू होत आहे. भारतातील वैविध्यपूर्ण रस्ते आणि प्रवासाची परिस्थिती लक्षात घेऊन, या प्रीमियम मोटारसायकलमध्ये आयकॉनिक जीएस डिझाइन, उत्कृष्ट कामगिरी आणि प्रगत तंत्रज्ञानाचा मिलाफ करण्यात आला आहे. यामुळे शहरातील रस्ते, महामार्ग आणि खडतर पायवाटांवर प्रवास करताना रायडर्सना कमालीचा आत्मविश्वास मिळेल.

# दौलतनाना शितोळे यांना विधान परिषद मिळावी

## कोरठण खंडोबा येथे महाआरती : महाआरती करत घातले साकडे : पारनेर तालुक्यातील बहुजन समाजाचा मोठा पाठिंबा

पारनेर : (स. गांवकरी)



आगामी काळात होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकांचे बिगुल वाजले असून, जय मल्हार क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दौलतनाना शितोळे यांना भारतीय जनता पक्षाकडून उमेदवारी मिळावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. या मागणीसाठी रविवारी श्रीक्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान येथे महाआरती करत देवाला साकडे घालण्यात आले. जय मल्हार क्रांती संघटनेचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आणि बलुतेदार समाजाचे नेते बाळासाहेब शिरतार यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा पार पडला. रविवारी सकाळी ९ वाजता पिंपळगाव रोठा येथील खंडोबा मंदिरात वाघ्या-मुरळीच्या उपस्थितीत तळी-भंडार उधळून महाआरती करण्यात आली. यावेळी 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता . दौलतनाना शितोळे यांना विधान परिषदेत प्रतिनिधित्व मिळावे, हाच या महाआरतीचा मुख्य उद्देश होता . दौलतनाना शितोळे यांनी संघटनेच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून बहुजन समाजाचे आणि तळागाळातील सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी मोठे कार्य केले आहे. राज्याचे नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या 'गुड बुक'मधील आणि अत्यंत विश्वासू नेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यामुळे त्यांच्या या कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांना आमदार म्हणून संधी द्यावी, अशी भावना यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. यावेळी युवक कोअर कमिटीचे अध्यक्ष सनी खंडागळे, राज्य कार्यकारिणी सदस्य आप्पासाहेब बोरुडे, पुणे जिल्हाध्यक्ष श्री. गोफणे सर, बेल्हे गावचे उपसरपंच नवनाथ शिरतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच बबनराव म्हस्कुले, संदीप म्हस्कुले, अविनाश पांढरे, पत्रकार संदीप शितोळे, रोहिदास बोरुडे, अशोकशेठ कणीरोहक, गणेश शिरतार, गणेश जेजुरकर, किरण पोपळघट, शरद हिंगडे, गणेश बर्वे, पवन बोरुडे, ज्ञानेश्वर बोरुडे, अश्विनी बोरुडे, कु. अनामिका बोरुडे, रमेश कानिंगध्वज, चेअरमन सुरेश कानिंगध्वज, संजय बोरुडे, मयूर बोरुडे, संतोष भंडलकर आणि गोरख बोऱ्हाडे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

दौलतनाना शितोळे यांनी आयुष्यभर बहुजन समाजाच्या न्याय-हक्कासाठी संघर्ष केला आहे. ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी असून प्रशासकीय कामांत त्यांचा हातखंडा आहे. शितोळे यांच्यासारखा अभ्यासू नेता विधान परिषदेवर गेल्यास विधीमंडळात बहुजन समाजाला हक्काचा आवाज मिळेल. भाजपने त्यांच्या निष्ठेचा विचार करून त्यांना उमेदवारी द्यावी, हीच आमची आग्रही मागणी आणि खंडोबा चरणी प्रार्थना आहे.

**- बाळासाहेब शिरतार (राज्य सरचिटणीस जय मल्हार क्रांती संघटना, महाराष्ट्र)**

# पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये गुणवंतांचा भव्य सत्कार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




अहिल्यानगर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता दहावी (शैक्षणिक वर्ष २०२५-२६) मध्ये उत्कृष्ट यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या एकूण २१ विद्यार्थ्यांचा यावेळी पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्राचार्य, उपमुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावर्षीचा दहावीचा निकाल मागील वर्षाच्या तुलनेत अधिक चांगला लागल्याने शाळेत आनंदाचे वातावरण होते. मागील वर्षी ११ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले होते, तर यंदा ही संख्या वाढून २१ वर पोहोचल्याने शाळेच्या गुणवत्तेत झालेली वाढ अधोरेखित झाली.

शाळेचे प्राचार्य मा. मंगेश जगताप यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, "आजचा हा समारंभ आपल्या शाळेसाठी अभिमानाचा क्षण आहे. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी मेहनत, चिकाटी आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. पुढील वर्षी याहून अधिक चांगला निकाल लागेल, असा विश्वास आहे." त्यांनी यशासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्वही अधोरेखित केले. तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा हे विद्यार्थ्यांच्या यशाचे मुख्य आधारस्तंभ असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून श्री. सचिन धस, श्री. चंद्रकांत ऊरमुडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी कठोर परिश्रम आणि सातत्याचे महत्त्व स्पष्ट करत शाळेने केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमात बिनिश काझी, विनय चेडे, ऐश्वर्या व्यास आणि सिद्धी उरमुडे या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील अनुभव कथन केले. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचा पाठिंबा आणि स्वतःवर विश्वास या घटकांमुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य मा. मंगेश जगताप, उपप्राचार्य शगुफ्ता काझी, सीनियर एडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव, एडमिन ऑफिसर नितीन गवांदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील आर्या बाजड आणि संस्कृती माने यांनी केले.

# जनता कन्या विद्यालयाची दैदीप्यमान कामगिरी

श्रीगोंदा (स. गांवकरी)



■ एनएमएमएस परीक्षेत आठ विद्यार्थिनींचे यश

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेत श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील जनता कन्या विद्यालयाने उल्लेखनीय व ऐतिहासिक यश संपादन केले आहे. विद्यालयातील एकूण आठ विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या असून प्रत्येक विद्यार्थिनीला 48 हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. त्यामुळे विद्यालयाला एकूण 3 लाख 84 हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे.

यामध्ये पाचपुते समृद्धी संतोष, काळोखे तनिष्का सागर, दिवेकर संस्कृती बापू, रंधवे गौरी राजेंद्र, मोरे तन्वी संजय, काटकर समृद्धी महेश, खंडागळे राजेश्वरी गणेश आणि पोटे भाग्यश्री नामदेव या विद्यार्थिनींचा समावेश आहे. या विद्यार्थिनींना एनएमएमएस विभाग प्रमुख सचिन डमरे (सामान्य विज्ञान व बुद्धिमत्ता), दत्तात्रय मुळीक (गणित) आणि प्रवीण काळे (सामाजिक शास्त्र) यांचे मार्गदर्शन लाभले.

मागील सात-आठ वर्षांपासून विद्यालयाने एनएमएमएससह विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळवत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे काष्टी व पंचक्रोशीतील विद्यार्थी व पालकांमध्ये विद्यालयाबाबत विशेष आकर्षण निर्माण झाले आहे.

# ओतूर येथे एक दिवसीय रांगोळी कार्यशाळा संपन्न

## भारतीय संस्कृती आणि कलेचा एक सुरेख संगम म्हणजे रांगोळी !

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील गाडगे महाराज विद्यालयाच्या सभागृहात रंग शारदा, शिवनेरीचे शिलेदार समूह व स्व. वैभवदादा विजयराव देशमुख प्रतिष्ठान ओतूर यांच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

रांगोळी ही भारताची हजारो वर्षाची सांस्कृतिक परंपरा आहे. भारतीय घरामध्ये सण समारंभाला दारापुढे रांगोळी काढणे हे शुभ मानले जाते. रांगोळी केवळ घराची सजावट करत नाही,तर ती घरात सकारात्मक ऊर्जा आणि आनंद निर्माण करते. आणि हीच कला अधिकाधिक लोकां पर्यंत पोहोचविण्यासाठी आणि पिढ्यानंपिढ्या ती टिकवून ठेवण्यासाठी या रांगोळी कार्यशाळेच आयोजन करण्यात आल्याचे पोपट नलावडे यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे अक्षदाताई मांडे, नितीन पाटील, प्रसाद मुंढे, संजय नलावडे, सुरेखाताई भोर या मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यशाळेचा प्रारंभ झाला.

या कार्यशाळेत १५० पेक्षा जास्त शालेय मुली व महिला भगिनी यांनी सहभाग नोंदवला. सुप्रसिद्ध रांगोळीकर प्रसाद मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली रांगोळी कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेतून नवीन पिढीला ठिपक्याची रांगोळी पासून अगदी मोठी रांगोळी कशी काढायची याची सखोल माहिती प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात आली. तसेच काही प्रेरणादायी अनुभव देखील मुंढे यांनी सांगितले. रांगोळी ही एक कला तर आहेच पण याचं रांगोळी कलेने अनेकांना अगदी जागतिक पातळीवर नेण्याचं काम कस केल याची उदाहरणं दिली.

स्वतः प्रसाद मुंढे यांचा दोन वर्षांपूर्वी एका अपघातात एक डोळा कायमचा निकामी झाल्यानंतर देखील त्यांनी न खचता, न डगमगता आपला रांगोळी कलेचा छंद कसा जोपासला हे सांगताना या अपघातातून बाहेर पडून जो जागतिक विक्रम केला याचा थरारक अनुभव सांगितला. या कार्यशाळेस जिल्हा परिषद सदस्या छायाताई तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, जेष्ठ साहित्यिक सुधाकर घोडेकर, कमांडो राम शिंदे, शिवनेरीचे शिलेदार समूह सदस्य नंदुशेठ भोर, शरद डुंबरे, रवि येरंडे, सुशीला डुंबरे, प्रदीप सूर्यवंशी, नितीन डुंबरे, वैभव डुंबरे, निलेश तांबे यांनी सदिच्छा भेट दिल्या. उपस्थित मान्यवारांचा हस्ते कार्यशाळेत सहभागी सदस्यांना प्रशस्ती पत्रक देण्यात आले.

कार्यक्रमाच आयोजन आणि नियोजन सुरेखाताई भोर, मेघनाताई देशमुख, शुभदा गाढवे मॅडम,मनीषा पाटील मॅडम, राणी तांबे, स्वाती फापाळे, रेणुकाताई डुंबरे यांनी केले. गाडगे महाराज संस्थेचे संचालक नितीन पाटील, मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या उपक्रमासाठी समूह शिलेदार करुणाताई नेहरकर यांचे विशेष योगदान लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा तांबे यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## ‘तेरा तुझको अर्पण’ या कार्यक्रमांतर्गत ४० मोबाईल फोन मूळ मालकांना परत

डांग.गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्हा पोलिसांनी “सेवा, सुरक्षा आणि शांतता” या घोषवाक्याला साजेशी अशी एक प्रशंसनीय कामगिरी केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली, लोकल क्राईम ब्रांच (LCB) आणि विविध पोलीस ठाण्यांच्या समन्वयातून मागील दोन महिन्यांत जप्त केलेले ७,२३,२०० रुपयांच्या किमतीचे ४० मोबाईल फोन त्यांच्या मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत.डांग जिल्हा पोलीस संपूर्ण गुजरात राज्यात ८०.०३% या उच्चतम रिकव्हरी रेटसह प्रथम क्रमांकावर राहिले आहेत. मागील दोन वर्षांत पोलिसांनी एकूण ४७,३१,६०० रुपयांच्या किमतीचे २९७ मोबाईल फोन शोधून अर्जदारांना परत दिले आहेत. ही यशस्वी कारवाई सुरत रेंजचे आयजीपी प्रेमवीर सिंह आणि एसपी पूजा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली डांग LCB चे पीएसआय जे. जी. अनडकट आणि त्यांच्या टीमने तांत्रिक तसेच मानवी स्रोतांच्या मदतीने साध्य केली आहे. या कार्यक्रमांतर्गत आहवा, सुबीर, वघई आणि सापुतारा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील नागरिकांना त्यांचे हरवलेले किंवा चोरीस गेलेले मोबाईल परत मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.



## ठाण्यात चोरीची फॉर्च्यूनर कार सह ४ आरोपी अटकेत

ठाणे (स. गांवकरी) : भवर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २६०/२०२६ अंतर्गत फॉर्च्यूनर वाहन चोरीची तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल होताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्य मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला. प्रसंगी वर्तकनगर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने चोरीस गेलेली फॉर्च्यूनर कार अवघ्या आठ तासांत शोधून काढत चार आरोपींना अटक केली. या कारवाईमुळे वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी अंकुश ठेवण्यात पोलिसांना यश आले असून, या कामगिरीबद्दल पथकाचे कौतुक होत आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास रहाणे यांच्या नेतृत्वाखालील तपास पथकाने तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढून अवघ्या आठ तासांत चोरीस गेलेली फॉर्च्यूनर हस्तगत करण्यात आली.प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई सुरू आहे. पोलिसांनी आरोपींकडून अधिक चौकशी सुरू केली असून, या टोळीचा इतर वाहनचोरीच्या घटनांशी संबंध आहे का, याचाही तपास केला जात आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तपास पथकाच्या तत्परतेचे कौतुक करत अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा दिला आहे.

## भरधाव वाहनाने मिरवणुकीतील एका युवकाचा मृत्यू, तर एक जखमी



भोकर (स. गांवकरी) : रविवार दि. २६ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील शहीद प्रफुल्ल नगर येथील भीम जयंती मंडळाची मिरवणूक नांदेड रोड वरील उड्डाणपुलावर आली असता मिरवणुकीत एक भरधाव वाहन शिरल्याने एका युवकाचा मृत्यू तर एक युवक गंभीर जखमी झाल्याची घटना २६ एप्रिल रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली. शहरातील शहीद प्रफुल्लनगर येथून डॉ. आंबेडकर यांच्या तैलचित्राची मिरवणूक निघाली होती. दरम्यान, उड्डाणपुलावर मिरवणूक आली असता शहरातून नांदेडकडे जाणाऱ्या पीक अप बोलेरो वाहन (क्र. एमएच २६ सीएच ३७४१) वरील चालकाचा ताबा सुटल्याने समोरुन जल्लोषात येत असलेल्या भीम जयंती मिरवणुकीत घुसली. या प्रसंगी जल्लोषात सहभागी असलेल्या शेकडो महिला, युवतीसह लहान -थोरांना वाचण्यासाठी प्रयत्न करत असतांना झालेल्या अपघातात संदिप भिमराव गायकवाड व खंडेश्वर भारत जिलेवाड हे दोन्ही युवक जखमी झाले. यातील गंभीर जखमी संदिप गायकवाड यास अधिक उपचारासाठी नांदेडला रवाना केले असता वाटेतच मृत्यू झाला आला आहे. भीम जयंती मिरवणूक संपवण्यासाठी काही अंतर शिल्लक असताना घडलेल्या या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. सदर घटनेनंतर वाहनचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याचे विरुद्ध गुन्हाही दाखल होईल मात्र करोडो रुपये खर्चून शहरा बाहेरून वळण रस्ते केलेले असतानाही मालवाहू वाहतूक शहरातून येतेच कशी? त्यातही नियोजित जयंती मिरवणुकीच्या मार्गावरून मालवाहू वाहतूक का सोडण्यात आली? असा सवाल शहरातील नागरिकांकडून विचारण्यात येत आहेत.

## नांदेड तालुका महसूल प्रशासनाचा शोध वंचित लाभार्थ्यांचा विशेष उपक्रम

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड तालुक्यात महसूल विभागाने महाराजस्व समाधान शिबिराच्या माध्यमातून "शोध वंचित लाभार्थ्यांचा" या नावीन्यपूर्ण विशेष उपक्रमांतर्गत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असूनही वंचित असणाऱ्या लाभार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना लाभ देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. यामुळे शासनाच्या विविध योजनांच्या लाभार्थी संख्येत वाढ होणार आहे. नांदेड तालुक्यातील हा नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात लक्षवेधी ठरू शकतो. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनात व उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांच्या सूक्ष्म नियोजनात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर नांदेड तालुक्यातील वाजेगाव महसूल मंडळातील वाजेगाव येथे राष्ट्रमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात येत्या 30 एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता घेण्यात येणार आहे. सदर शिबिराचे उद्घाटन नांदेड दक्षिण विधानसभेचे आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर यांच्या हस्ते होणार आहे. या शिबिरात महसूल विभागाबरोबरच शासनाच्या विविध विभागाकडून लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे.

# कहाळा बुद्रुक येथील सरपंच सुनील लुंगारे प्रशासक पदावरून पायउतार

### जलजीवनच्या कामाचे नुकसान करून पाणीपुरवठ्यात आणला व्यत्यय



नायगाव : (स. गांवकरी)

नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या कहाळा बुद्रुक येथील जलजीवन योजनेचे काम गुत्तेदाराने वेळेत पूर्ण करून ग्रामस्थांना नळाद्वारे पाणीपुरवठा केला. मात्र, तत्कालीन सरपंच सुनील लुंगारे यांनी ही योजना ग्रामपंचायतमध्ये सामावून न घेता, उलट पाइपलाइन व अनेक नळांचे जाणीवपूर्वक जेसीबीने मोडतोड केली. या प्रकाराची तक्रार गुत्तेदार सूरज कहाळेकर यांनी केली असता, प्रशासनाने याची दखल घेतली आहे. त्यामुळे सुनिल लुंगारे यांची प्रशासक म्हणून केलेली नियुक्ती रद्द करून त्याठिकाणी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बी. एस. जाधव यांची नियुक्ती करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिला आहे. कहाळा बुद्रुक येथील जलजीवन मशीनचे काम सूरज माधवराव कहाळेकर यांनी केले. जवळपास दीड कोटी खर्चातून काम पूर्ण होऊन गावात नळाला पाणी येत असल्याचा अहवाल तात्कालीन पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी दिला होता. परंतु नंतरच्या काळात सरपंच सुनील लुंगारे यांनी पाणीपुरवठ्याचे नळ मोडून पाइपलाइनचे नुकसान केले. तसोच स्वतःच्या घरासमोरील नळ तोडून अनधिकृतरीत्या अतिक्रमण करून पायऱ्या बांधल्या. परिणामी, उन्हाळ्याच्या दिवसांत पाणीपुरवठा ठप्प झाला असून, ग्रामस्थांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. सदर प्रकाराची तक्रार सूरज कहाळेकर यांनी केल्यामुळे ते प्रकरण थेट विभागीय आयुक्त कार्यालयापर्यंत गेले. सूरज माधवराव कहाळेकर यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (एक) नुसार प्राप्त विवाद अर्जावर संदर्भ क्रमांक (एक) द्वारे ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद नांदेड या कार्यालयास विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर महोदयांनी निर्णय कळविलेला आहे. प्राप्त आदेशातील मुद्दा क्रमांक (३) गैर अर्जदार सरपंच सुनील अंबादासराव लुंगारे हे सरपंच पदावर असताना शासकीय मालमत्तेचे / पाणीपुरवठा योजनेचे नुकसान करणे व त्यामुळे गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणे हा ठपका ठेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संपूर्ण योजनेचे पुन्हा मूल्यांकन करून झालेले नुकसान सरपंच यांच्याकडून वसूल करून शासनखाती भरणा करण्याची कार्यवाही करावी व योजना पुन्हा कार्यान्वित करून गावकऱ्यांना पाणी उपलब्ध करून द्यावे, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आदेशित केल्याचे पत्र संबंधित विभागाला प्राप्त झाले आहे.

गावकऱ्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागू नये म्हणून शासनाने जलजीवन योजना राबविली. कहाळा येथे ही योजना वेळेत पूर्ण होऊन प्रत्येक घराला नळ जोडणी देऊन पाणी पोहोच करण्यात आले. मात्र, सरपंच पदाचा गैरवापर करून सुनील लुंगारे यांनी या योजनेच्या पाइपलाइनची व नळांची मोडतोड केल्याने गावकऱ्यांना पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. त्यामुळे खासगी पाणी विकत घ्यावे लागत आहे. सरपंच पदाचा गैरवापर करून पाण्यापासून दूर ठेवल्यामुळे गावकऱ्यांतून सुनील लुंगारे यांच्याबद्दल रोष व्यक्त होत आहे. आर्थिक फायद्यासाठी शासनाच्या कामाचे नुकसान करून अडथळे आणल्याचे गावकरी म्हणू लागले आहेत.

## लोह्यात कृषी निविष्ठा विक्रेत्याचा बेमुदत संप

लोहा : (स. गांवकरी)

लो ह्यात कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी दि.२७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत संप पुकारला असुन लोहा तालुका सीडस पेस्टीसाईडस फर्टिलायझर्स असोसिएशन लोहा च्या वतीने लोहा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे. पुढे निवेदनात असे नमूद केले की, राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या बियाणे, रासायनिक खते, व किटकनाशके औषधी विक्री व्यवसायातील अडचणीतील न्याय होण्यासाठी विक्रेत्यांच्या माफया संघटनेकडून राज्याचे कृषीमंत्री , प्रधान सचिव (कृषी), राज्याचे कृषी आयुक्त, व राज्याचे कृषी निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाचे प्रमुख यांच्याकडे ४-५ वर्षांपासून सदरील प्रकरणाबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे परंतु राज्याच्या कृषी विभागाकडून विक्रेत्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत अद्याप पर्यंत ठोस कारवाई झालेली नाही त्यामुळे आता संघटनेच्या वतीने खालील मागण्या संदर्भात बेमुदत संप पुकारला आहे. संघटनेच्या प्रथम मागण्या कंपन्या कडून रासायनिक खत पुरवठा होताना होति असलेला लिंकिंग बंद करण्यात यावा, शेजारील राज्यातुन येणारे अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाणे प्रतिबंधक व्हावे, प्रमाणित बियाण्यासंबधी साथी पोर्टलच्या वापरायची विक्रेत्यावर सक्ती न करता साथी पोर्टल बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपनी पर्यंत पाठविणे, रासायनिक खतांच्या विक्री मार्गिन मध्ये वाढ करण्यात यावी, विक्रते बियाणे पुरवठादार कंपन्यांकडून सीलबंद पॅकिंग मध्ये खरेदी करुन शेतकऱ्यांस सिलबंद पॅकिंग मध्ये खरेदी करुन शेतकऱ्यांस सिलबंद पॅकिंग मध्येच विक्री करीत असल्यामुळे तपासणी मध्ये बियाणे सॅम्पल फेल गेल्यास विक्रेत्यास आरोपी न करता साक्षीदार म्हणून मान्यता देण्यात यावी.

## इस्रो अभ्यास दौऱ्यास उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते हिरवा झेंडा

ठाणे : (स. गांवकरी)




ठाणे जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ‘मिशन भरारी’ या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत निवड झालेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या इस्रो अभ्यासदौऱ्यास उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज, दि. २७ एप्रिल, २०२६ रोजी हिरवा झेंडा दाखविण्यात आला. हा शुभेच्छा समारंभ जिल्हा नियोजन भवन, ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, “‘मिशन भरारी’ हा केवळ उपक्रम नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा एक व्यापक प्रयत्न आहे. आपल्या मातीतल्या लेकरांना आभाळाशी नाते जोडण्याची ही संधी आहे. अल्पावधीत, केवळ तीन महिन्यांत हा उपक्रम प्रत्यक्षात उतरविणे हे प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे. पूर्वी सरकारी कामांना विलंब होत असल्याची धारणा होती; मात्र आज शासनाच्या कार्यपद्धतीत वेग आणि परिणामकारकता दिसून येते.”

ते पुढे म्हणाले, “या स्पर्धेतून निवड झालेले ५९ विद्यार्थी हे माझ्या दृष्टीने ‘सायन्स सोल्जर्स’ आहेत. जसे सीमेवरील जवान देशाचे रक्षण करतात, तसे हे विद्यार्थी देशाचे वैज्ञानिक भविष्य घडवतील. विज्ञान म्हणजे केवळ माहिती नसून जिज्ञासा आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती आहे. ‘का?’ हा प्रश्न विचारण्याची सवय जोपासा. हीच सवय तुम्हाला मोठ्या शोधांपर्यंत घेऊन जाईल.”

“ही सहल केवळ पर्यटन नसून प्रत्यक्ष विज्ञानाचा अनुभव देणारी आहे. विक्रम साराभाई अवकाश केंद्र, थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशन यांसारख्या ठिकाणी भेट देताना मिळणारा अनुभव तुमच्या आयुष्याला नवी दिशा देईल. शाळेतील ३६५ दिवसांच्या शिक्षणाइतकेच हे काही दिवस महत्त्वाचे ठरणार आहेत,” असेही त्यांनी नमूद केले. तसेच, “ग्रामीण भागात अपार क्षमता आहे. योग्य संधी आणि व्यासपीठ दिल्यास ही मुलेही आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेऊ शकतात. भविष्यात याच विद्यार्थ्यांमधून ए. पी. जे. अब्दुल कलाम किंवा कल्पना चावला यांच्यासारखे शास्त्रज्ञ घडतील,” असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि देशासाठी कार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

## चैतन्य विद्यालयाचा विशेष पुरस्काराने सन्मान

(स. गांवकरी)




ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरचा गुरुवार दिनांक २३ एप्रिल रोजी गणेश कला क्रीडा रंगमंच पुणे येथे झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५-२६ मध्ये विशेष प्राविण्य मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर उपसंचालक डॉक्टर गणपतराव मोरे पुणे जिल्हा माध्यामिक विभागाचे शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली .

पुणे जिल्हा परिषद ,माध्यमिक शिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांचे संयुक्त विद्यमाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान दरवर्षी राबविले जाते.या अभियानांतर्गत सर्व माध्यमिक शाळा भौतिक सुविधांनी सुसज्ज आहे की नाही हे पाहणे ,शैक्षणिक गुणवत्ता वाढीस तपासणे व वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे,विविध शासकीय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतो का हे तपासणे,विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासणे,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम,कार्यक्रम यांची अंमलबजावणी होते का तसेच शिक्षकांची गुणवत्ता व विद्यार्थ्यांसाठी योगदान आदी बाबी यात तपासल्या जातात.सलग दोन वर्षे चैतन्य विद्यालय या अभियानामध्ये जिल्ह्यात सातत्यपूर्ण कामगिरी करत आहे. त्यामुळे यावर्षी विद्यालयास विशेष प्राविण्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

यात्प्रसंगी सचिव महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळचे नंदकुमार सागर , सचिव पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघा चे शिवाजी कामथे,ग्राम विकास मंडळ ओतूरचे सचिव प्रदीप गाढवे ,पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप ,मुख्याध्यापिका राजश्री भालेकर,भाऊसाहेब खाडे, अजित डांगे उपस्थित होते . विद्यालयास विशेष प्राविण्य पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे, राजेंद्र डुंबरे,रघुनाथ तांबे, प्रदीप गाढवे,पंकज घोलप, राजश्री भालेकर, संजय हिरे , अनिल उकिरडे यांनी सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले तसेच पालक वर्गाकडूनही विद्यालयाचे कौतुक होत आहे.

## किनवटमध्ये कृषी निविष्ठा विक्रेत्यांचे आंदोलन सुरू

किनवट : (स. गांवकरी)




कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी पूर्वघोषित इशाऱ्यानुसार आजपासून किनवट तालुक्यात आंदोलनास सुरुवात केली असून तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रे कडकडीत बंद ठेवण्यात आली आहेत. बियाणे, खते व कीटकनाशके विक्री पूर्णपणे ठप्प झाल्याने बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कृषी निविष्ठा विक्रेता संघटनेने आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा आंदोलनात्मक पवित्रा घेतला आहे. यापूर्वी संघटनेने उपविभागीय अधिकारी (एसडीएम) किनवट यांना निवेदन सादर करून २७ एप्रिलपासून विक्री केंद्र बंद ठेवण्याचा इशारा दिला होता. मात्र, मागण्यांवर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर विक्रेत्यांनी संपाचा मार्ग स्वीकारला. विक्रेत्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये रासायनिक खतांचा नियमित पुरवठा, एचटीबीटी कापूस बियाण्यांवरील निर्बंधांबाबत स्पष्ट धोरण, परवाना प्रक्रियेत सुलभता, तसेच उत्पादक कंपन्यांच्या अटींमध्ये सुसूत्रता आणणे यांचा समावेश आहे. याशिवाय ‘FOR’ पद्धतीने थेट विक्री केंद्रापर्यंत माल पोहोचविण्याची सक्ती व जीएसटीनुसार होणाऱ्या खर्चाचा विचार करून योग्य नफा देण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, सध्या खरीप हंगामाच्या तोंडावरच हे आंदोलन सुरू झाल्याने शेतकऱ्यांना बियाणे व खतांच्या उपलब्धतेबाबत अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली.

# डॉ. पृथ्वीराज तौर यांना 'फ्रेंड्स ऑफ नवासा' आंतरराष्ट्रीय पुरस्कार

### दक्षिण आफ्रिकेतील राष्ट्रीय लेखक संघाकडून सन्मान

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख तथा भाषा संकुल संचालक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना नॅशनल रायटर्स असोसिएशन ऑफ साऊथ आफ्रिका या शिखर साहित्य संस्थेच्यावतीने 'फ्रेंडस ऑफ नवासा' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थेचे महासचिव सुप्रसिद्ध आफ्रिकी कादंबरीकार डॉ. लेबोगँग लान्स नावा यांनी दि २६ एप्रिल रोजी पुरस्काराची घोषणा केली.

साहित्य क्षेत्रातील कवी, लेखक, भाषांतरकार, कार्यकर्ते अशा स्वरूपात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना २०२१ पासून हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी दि २३-२४ मे २०२६ रोजी 'नवासा'च्या जनरल असेम्ब्लीमध्ये आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्काराचे वितरण होणार आहे. 'लेखणी आणि मिसाईल' या विषयावर महासभेत विचारविनिमय होत आहे. 'आनंदोत्सवाचा विश्वसेतू' या डॉ. पृथ्वीराज तौर यांच्या ग्रंथामध्ये पंचविस देशातील चाळीस कवींच्या कविता मराठी भाषेत भाषांतरित करण्यात आल्या आहेत. त्यात दक्षिण आफ्रिकेतील समकालीन लेखकांचे साहित्य समाविष्ट आहे. भाषांतरांच्या माध्यमातून दक्षिण आफ्रिकेतील साहित्याच्या विकास व संवर्धनासाठी प्रयत्न केल्याबद्दल आणि 'कॅलाबॅश' या मुखपत्राच्या सोहळ्यात सहभागी होऊन संस्थेची प्रतिमा उंचावल्याबद्दल डॉ तौर यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रशस्तीपत्र आणि पदक असे पुरस्काराचे स्वरूप असून पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पृथ्वीराज तौर नॅशनल रायटर्स असोसिएशन ऑफ साऊथ आफ्रिकेच्या जनरल असेम्ब्लीला समर्थन संदेश देऊन संबोधित करणार आहेत.




दक्षिण आफ्रिकेतील शिखर साहित्य संस्थेकडून 'फ्रेंड्स ऑफ नवासा' या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ पृथ्वीराज तौर यांचे स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ ज्ञानेश्वर पवार, परीक्षा संचालक डॉ. हुशारसिंग साबळे, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. पराग खडके, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपाल चिखलीकर, आयक्युएसी संचालक डॉ सुरेंद्र रेड्डी, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, डॉ. सुरवसे, डॉ. वैजयंता पाटील, डॉ. निलेश देशमुख, डॉ पराग भालचंद्र यांनी अभिनंदन केले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## कल्पना शिंदे (देशमुख) यांचे निधन



तामसा (स. गांवकरी) : तामसा येथील निष्ठावंत भाजप कार्यकर्ते निरंजन शिंदे यांचा सौभाग्यवती कल्पना शिंदे( देशमुख) (60)यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. त्यांच्या अंतिमसंस्कार त्यांच्या शेतात दिनांक 27रोजी 5 वाजता करण्यात आलं कल्पना शिंदे च्या मृत्यु पश्चात त्यांचे पती , एक मुलगा एक मुलगी,सुना नाती,नातवंड असा परिवार आहे. भारतीय जनता पार्टी सोशल मीडिया सहसंयोजक राहुल शिंदे यांचे मातोश्री होत्या.

## जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्ह्यात २७ एप्रिल सकाळी ६ वाजेपासून ते ११ मे मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३० ( १) व ( ३) अन्वये जिल्ह्यात २७ एप्रिल सकाळी ६ वाजेपासून ते ११ मे च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही. अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

## बुधवारी हदगाव येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : नांदेड जिल्हयातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व वैराग्यमूर्ती दत्ताबापू शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था हदगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि २९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजेपासून वैराग्यमूर्ती दत्ताबापू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हदगाव येथे पंडीत दिनदयाळ उपाध्याय प्लेसमेट ड्राईव्ह/ रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये नामांकित उद्योजक तसेच शाळा व महाविद्यालय तसेच इतर खाजगी आस्थापनांमध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी बुधवार 29 एप्रिल 2026 रोजी रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त डॉ.रा.म. कोल्हे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र , आनंदनगर रोड, बाबा नगर नांदेड कार्यालयाचा ई-मेल आयडी nandedrojgar01@gmail.com आणि कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक 02462-251674 यावर संपर्क साधावा, असेही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.



## झाडे लावायची तरी कशाला? – माजी आमदार डॉ. सुधीर तांबे

संगमनेर (स. गांवकरी) : संगमनेर तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर जंगलांना लागणाऱ्या आगीमुळे पर्यावरणाला गंभीर फटका बसत असून या घटनांबाबत प्रशासनाकडून समाधानकारक उपाययोजना होत नसल्याचा आरोप माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केला. मालदाड येथे लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. वारंवार लागणाऱ्या आगींमुळे झाडे आणि वन्यजीवांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता आणि नैराश्य वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले. “आपण दंडकारण्य अभियानाच्या माध्यमातून वृक्षलागवड आणि पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करत आहोत. मात्र, अशा प्रकारे आगी लागत राहिल्या तर झाडे लावायची तरी कशाला?” असा सवाल त्यांनी उपस्थित केला. हे चित्र केवळ संगमनेरपुरते मर्यादित नसून राज्यभरात अनेक ठिकाणी अशा घटना घडत असल्याचे त्यांनी सांगितले. पेठ आणि कळवण तालुक्यातही मोठ्या प्रमाणावर जंगलांना आग लागल्याची उदाहरणे त्यांनी दिली. मालदाड येथे अलीकडेच डोंगरावर लागलेल्या आगीमुळे स्थानिक सरपंच आणि नागरिक हतबल झाल्याचे त्यांनी नमूद केले. जंगलांना आग लागू नये यासाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याचे सांगत त्यांनी वनविभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “झाडे लावण्याबरोबरच ती जगली पाहिजेत, यासाठी जनजागृती आणि ठोस कृती आवश्यक आहे. आगी का लागतात याचे नेमके कारण शोधून त्यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भात वनमंत्र्यांना निवेदन देणार असल्याचे सांगत, राज्यभरातील जंगलांमध्ये लागणाऱ्या आगी रोखण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणीही डॉ. तांबे यांनी केली.

## 'एसीलोर स्टेलेस्ट' ही मान्यताप्राप्त एकमेव चष्मा लेन्स

नवी दिल्ली (स. गांवकरी) : गेल्या वर्षाच्या उत्तरार्धात, एसीलोर लक्सोटिकाने जाहीर केले की, अमेरिकेच्या अन्न आणि औषध प्रशासनाने त्यांच्या 'एसीलोर स्टेलेस्ट' लेन्सला 'डी नोव्हो' मार्गाद्वारे बाजारपेठेत विक्रीसाठी अधिकृत मान्यता दिली आहे. यापूर्वी 2021 मध्ये अन्न आणि औषध प्रशासनाने या उत्पादनाला 'ब्रेकथ्रू टेक्नॉलॉजी' (महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान) म्हणून दिलेल्या मान्यतेनंतरचा हा पुढचा टप्पा आहे. एसीलोर स्टेलेस्ट ही मुलांमधील मायोपियाचा वेग कमी करण्यासाठी अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाकडून बाजारपेठ मान्यता मिळालेली पहिली आणि एकमेव चष्मा लेन्स आहे. या लेन्सची परिणामकारकता क्लिनिकल डेटाद्वारे सिद्ध झाली असून, यामुळे दोन वर्षांच्या कालावधीत मुलांमधील मायोपिया वाढण्याचा वेग सरासरी 71% ने मंदावल्याचे दिसून आले आहे. भारतात मायोपियाच्या (नजीकचा दृष्टीदोष) प्रमाणात होणारी तीव्र वाढ ही एक वाढती चिंतेची बाब आहे. 2050 पर्यंत भारतातील शहरी भागातील जवळपास 50% मुले यामुळे बाधित होण्याची शक्यता आहे. आपल्या वैद्यकीय विश्वासार्हतेच्या वारशासह, एसीलोर लक्सोटिकाचे उद्दिष्ट 'नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स' आणि जागतिक मानकांनुसार, मायोपियाचा वेग कमी करण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन मंजूर नवकल्पनांद्वारे भारतातील मायोपिया उपचारांमध्ये प्रगती करणे हे आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेल्हे नं. १ झाली हायटेक

## २० लाखांच्या एआय-आयओटी रोबोटिक लॅबचे लोकार्पण



बेल्हे : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेल्हे नं. १ येथे विद्यार्थ्यांसाठी अत्याधुनिक एआय-आयओटी रोबोटिक लॅबचे लोकार्पण उत्साहात पार पडले. न्यू एज टेक्नॉलॉजीने सुसज्ज असलेली ही लॅब सिमुसॉफ्ट कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सुनील चोरे व गणेश चोरे यांच्या कुटुंबीयांनी मातोश्री स्व. यमुनाबाई सिताराम चोरे यांच्या स्मरणार्थ तब्बल २० लाख रुपये खर्च करून उभारली आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि भविष्यवेधी शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.या प्रसंगी एआय लॅबसह सुसज्ज बालवाचनालय लोकार्पण सोहळा आणि ग्रंथतुला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस , डॉ.मनिषाताई पळसकर प्रेसिडेंट प्रायमरी हेल्थ केअर,यांच्या हस्ते लॅब व वाचनालयाचे उद्घाटन डिजिटल पद्धतीने करण्यात आले. यावेळी लॅबमधील सादरीकरण करत बालचिमुकल्यांनी आपल्या कौशल्याने मान्यवरांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्नर पंचायत समितीचे सदस्य राजेंद्र पिंगट होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री प्रितम मुंजाळ यांनी केले. याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या स्मिता कणसे, माजी शिक्षणाधिकारी सिद्धार्थ चव्हाण ,जुन्नरचे गटविकास अधिकारी प्रतिक चन्नावार, गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे, सिमुसॉफ्ट कंपनीचे सुनील चोरे, गणेश चोरे, अंजली साठे,डॉ. विद्या चोरे आदी मान्यवर उपस्थित होते. लॅबसाठी फर्निचर सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामपंचायत उपसरपंच नवनाथ शिरतार, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामविकास अधिकारी यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रितम मुंजाळ, उपाध्यक्षा वैशाली मटाले व सर्व सदस्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला. तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंदांचा यावेळी सन्मान करण्यात आला. शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी या लॅबच्या माध्यमातून आधुनिक शिक्षणाची भक्कम पायाभरणी होणार असल्याचे मुख्याध्यापक सखाराम शेंडकर यांनी सांगितले. यावेळी चोरे बंधूंचे वडील सीताराम चोरे यांची ग्रंथतुला करून ती सर्व पुस्तके शाळेच्या वाचनालयासाठी भेट देण्यात आली. ग्रंथतुलेच्या माध्यमातून ज्ञानदान करत चोरे कुटुंबीयांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. लोकसहभागातून सुमारे २० लाख रुपये खर्चून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत उभारण्यात आलेली ही पहिलीच एआय-आयओटी रोबोटिक लॅब ठरली आहे. उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून देणगीदारांचे कौतुक करत आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रदीप पिंगट,सावकार पिंगट, कैलास औटी, कैलास आरोटे, ग्रामपंचायत सदस्य पल्लवीताई भंडारी,आप्पा मुलमुले , नाजीम बेपारी समीर गायकवाड, मंदाकिनी नायकोडी, तुषार डावखर किशोर अभंग ,ईश्वर पिंगट प्रशांत औटी, स्वाती कोकणे, रेश्मा बनकर ,नसरीन पठाण, प्रज्ञा शर्मा ,शेखर पिंगट,सुवर्णा कदम इ.उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन उपशिक्षिका मिरा बेलकर तसेच हरिदास घोडे,अशोक बांगर, रोहिदास साळवे, नुरजहाँ पटेल, प्रविणा नाईकवाडी, सुषमा गाडेकर व अंजना चौरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष डुकरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश चोरे यांनी मानले. चोरे परिवारा कडून सर्वांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## वसमतमध्ये सकल मुस्लिम युवक संघटनेला नवे नेतृत्व

वसमत : (स. गांवकरी)

सामाजिक व राजकीय क्षेत्रात सातत्याने सक्रिय राहून विविध प्रश्नांवर भूमिका मांडणारे युवा नेतृत्व मजहर महेबुब शेख यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या वसमत (जि. हिंगोली) शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे वसमत शहरातील संघटनात्मक कार्याला नवी ऊर्जा मिळणार असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. ही निवड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. अझरुद्दीन भाई सय्यद यांच्या मान्यतेने तर मराठवाडा अध्यक्ष मा. दानिश भाई कुरेशी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे. मजहर शेख हे सामाजिक भान ठेवून विविध उपक्रमांमध्ये पुढाकार घेणारे, तरुणांमध्ये लोकप्रिय आणि संघटन कौशल्य असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. शहरातील अनेक सामाजिक उपक्रम, जनजागृती मोहिमा, तसेच युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न लक्षवेधी ठरले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक मजबूत होऊन युवकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कामगिरी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नियुक्तीनंतर मजहर महेबुब शेख यांनी संघटनेच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानत, “वसमत शहरातील युवकांना संघटित करून शिक्षण, रोजगार, सामाजिक न्याय आणि एकात्मता यासाठी काम करण्यास प्राधान्य देणार आहे. सर्व घटकांना सोबत घेऊन सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न राहील,” अशी भावना व्यक्त केली. दरम्यान, त्यांच्या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. वसमत शहरात संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि परिणामकारक करण्यासाठी हे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## समर्थ कॉलेजमध्ये ड्रोन वर्कशॉप व ड्रोन स्पर्धा उत्साहात

(स. गांवकरी)



संरक्षण,आपत्ती व्यवस्थापन, सर्वेक्षण,चित्रिकरण,वैद्यकीय सेवा अशा अनेक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा प्रभावी वापर होत असल्याने विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळवणे अत्यंत आवश्यक असल्याचे यावेळी प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत ड्रोनचे बेसिक कंपोनंट्स,उड्डाण नियंत्रण प्रणाली,सेन्सर्सचा वापर,सुरक्षित उड्डाण पद्धती याबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले.तसेच ड्रोन तयार करणे,त्याचे प्रोग्रामिंग करणे आणि तांत्रिक अडचणी सोडविणे याबाबतही मार्गदर्शन मिळाले.

कार्यशाळेनंतर आयोजित ड्रोन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.विविध प्रकारचे ड्रोन उडवून विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक कौशल्य सादर केले.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना,समस्या सोडविण्याची क्षमता,नेतृत्वगुण आणि टीमवर्कची भावना वृद्धिंगत झाली. वेद कढणे,सार्थक देशमुख,साहिल खरगे,आदित्य चौधरी,सिद्धेश भुजबळ,पायल निकम,नूतन कोटकर यांनी ड्रोन टेक्नॉलॉजी या कार्यशाळेमध्ये विद्यार्थी समन्वयक म्हणून मोलाची कामगिरी बजावली. या उपक्रमाचे समन्वयक विभागप्रमुख प्रा.निर्मल कोठारी,प्रा.प्रियंका लोखंडे,प्रा. प्रियंका पोटफाडे, प्रा.सुचिता साबळे व प्रा.दिपाली गाडगे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर,डॉ.शरद पारखे तसेच संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य,विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मांडा टिटवाळ्यात कृत्रिम पिण्याच्या पाण्याची टंचाई

टिटवाळा : (स. गांवकरी)

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या महासभेत पिण्याच्या पाण्याबाबत अनेक नगरसेवकांनी आवाज उठविण्याबरोबरच खुद्द महापौरानी पिण्याच्या पाण्याची चोरी होत असल्याबाबत निदर्शनास आणले होते. परिणामी पिण्याच्या पाण्याची चोरी रोखण्यासाठी मोठी मोहीम राबविण्यात येऊन अनेक नळ जोडण्या खंडितही केल्या होत्या. मात्र मांडा टिटवाळा परिसरात कृत्रिम पाणी टंचाई करून जास्त पैसे देऊन पिण्यासाठी पाण्याचे टँकर मागवावे लागत असल्याबाबत नागरिकांनी नाराजगी व्यक्त केलेली आहे.



अ प्रभागातील मोहिली उदयचन केंद्राकडून बल्याणी मार्गे मांडा टिटवाळा परिसराकडे येत असलेल्या मुख्य भूमीगत जलवाहिन्यांना टॅप मारून अनेक चोरीचे अनधिकृत नळ कनेक्शन घेतले गेलेले आहेत. त्यामुळे मांडा टिटवाळा परिसराला पाणी टंचाईचा मोठा सामना करावा लागत आहे. नुकत्याच केडीएमसीच्या पाणी पुरवठा विभागाने १६ एप्रिल रोजी विशेष मोहीम राबवून बल्याणी परिसरातील ६७ अनधिकृत नळजोडण्या खंडित केल्या होत्या. मात्र तरी सुद्धा आजही अनेक ठिकाणी चोरीच्या जलवाहिन्या आजही कार्यरत आहेत. परिणामी अनेक इमारती व चाळींना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असून त्यांना जास्त पैसे मोजून पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. यात प्रामुख्याने हरी ओम वैली,साई संकुल,गणेश नगर,इंदिरा नगर इत्यादी ठिकाणच्या परिसरात दररोज कमी दाबाने पाणी सोडणे किंवा पाणी कमी सोडणे या गोष्टीमुळे येथील सोसायट्यानां एक दिवसाआड किंवा महिन्याचे तीसही दिवस पिण्याचा पाण्याचा टँकर आठशे ते नऊशे रुपये देऊन विकत घ्यावा लागत आहे. त्याच बरोबर प्रत्येक ट्रिप वेळी ड्रायव्हर ला १०० किंवा १५० रुपये हे द्यावे लागत असल्याची खंत काही नागरिकांनी बोलून दाखवली. केडीएमसीला टँकर भरायला पाणी आहे मग रात्री का पुरेपूर पाणी सोडत नाहीत असाही सवाल नागरिक विचारत आहेत. केडीएमसी सोडून अन्य खाजगी टँकर वाल्यांकडून पाणी मागविल्यास १२०० ते २००० पर्यंत जास्त रक्कम घेऊन बोअरवेल,विहीर अथवा नदीचे पाणी ते सोसायट्याना देत असतात. याबाबत पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता उदय सूर्यवंशी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी महापालिकेच्या नियमानुसार अ प्रभागासाठी पिण्याच्या पाण्यासाठी ३ टँकरची व्यवस्था केलेली असून इमारतीतील रहिवाश्याना ४०० रुपये दराने टिटवाळा येथील पाण्याच्या टाकीतून पिण्याचा पाण्याचा टँकर दिला जातो. तसेच शाळा कॉलेजेस यांना ६४० रुपये दराने तर केडीएमसीच्या बांधकाम परवानगी असलेल्या इमारतींच्या बांधकामासाठी २००० रुपये दराने पाणी टँकर देण्यात येतात. साधारण दिवसाला १५ ते १८ टँकर पिण्याचे पाण्याचे टँकर हे वितरित केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. तर याबाबत पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश डावरे यांच्याकडे संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

## शिर्डीत वारंवार वीज खंडितीविरोधात संताप

शिर्डी : (स. गांवकरी)



आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तीर्थक्षेत्र असलेल्या शिर्डीत देश-विदेशातून लाखो भाविक श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे शिर्डीकरांचे आद्य कर्तव्य मानले जाते. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच भाजपा प्रदेश उपाध्यक्ष व माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डी शहराच्या विकासाला गती मिळाली आहे. महावितरण विभागाच्या अनेक समस्याही यापूर्वी सोडविण्यात आल्या आहेत.मात्र सध्या वाढत्या उष्णतेमुळे शिर्डीत वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. घरगुती वापरासोबतच दुकाने, हॉटेल्स आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांचे आर्थिक नुकसान होत आहे. याशिवाय परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही याचा विपरीत परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा वारंवार खंडित करू नये, तसेच खंडित करावाच लागल्यास नागरिकांना पूर्वसूचना देण्यात यावी, तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करावी आणि नियमित वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तरीही यापुढे पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित झाल्यास महावितरण कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## पेडिग्री® ब्रँडचा नवा कॅम्पेन : क्रिकेटपटू जेमिमा रोड्रिग्स बनली ब्रँड फेस

पुणे : (स. गांवकरी)

डॉग फूड श्रेणीतील अग्रगण्य PEDIGREE® ब्रँडने आपल्या ग्रेवी रेंजला पाळीव प्राण्यांच्या मालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भारतीय क्रिकेटपटू जेमिमा रोड्रिग्सला आपल्या कॅम्पेनचा चेहरा बनवले आहे

हा कॅम्पेन वेट (ग्रेव्ही) डॉग फूडला एक संपूर्ण, रोजच्या आहाराचा भाग म्हणून अधोरेखित करतो आणि भारतातील वाढत्या पेट पेरेंट समुदायाला ते आपल्या पाळीव प्राण्यांसाठी पहिली पसंती म्हणून निवडण्यास प्रोत्साहित करतो।

मार्स इनकॉर्पोरेटेड ने आज भारतातील PEDIGREE® ब्रँडसाठी एक नवीन डिजिटल-फर्स्ट कॅम्पेन लॉन्च केल्याची घोषणा केली, जो भारतीय क्रिकेटपटू आणि पेट पेरेंट




जेमिमा रोड्रिग्स हिच्या सहकार्याने साकारण्यात आला आहे. हा कॅम्पेन आधुनिक पेट-पेरेंटिंगच्या बदलत्या वास्तवावर आधारित आहे, जो अधिक माहितीपूर्ण, पोषण-आधारित फीडिंगकडे वळण्यास प्रोत्साहित करतो, त्याच वेळी पाळीव प्राण्यांना आवडणाऱ्या गोष्टींमध्ये—चव—कोणतीही तडजोड न करता. 8 चिकन लिव्हर्सच्या प्रोटीन[1] इतका प्रोटीन, तसेच 100% संपूर्ण आणि संतुलित पोषणासह, शिफारसीनुसार दिल्यास, PEDIGREE® ग्रेव्ही पाळीव प्राण्यांसाठी एक स्वादिष्ट आणि पौष्टिक पर्याय आहे.

एक समर्पित पेट पेरेंट आणि भारतातील एक प्रमुख युवा क्रीडा व्यक्तिमत्त्व म्हणून, जेमिमा तिच्या शिस्त, ऊर्जा आणि परफॉर्मन्स-केंद्रित दृष्टिकोनासाठी ओळखली जाते. ती या कॅम्पेनला आपला प्रभावी आवाज देते—फक्त एक क्रिकेटपटू म्हणून नव्हे, तर एक पेट पेरेंट म्हणूनही, जी पाळीव प्राण्यांसाठी योग्य आहार निवडीचे महत्त्व समजते.

PEDIGREE® ग्रेव्हीला एक रोजच्या वापरासाठी फीडिंग सोल्यूशन म्हणून मांडले गेले आहे, ज्याला वॉल्थम पेटकेअर सायन्स इन्स्टिट्यूट चा पाठिंबा आहे. हे भारतातील वेट फूड श्रेणीमध्ये मार्स पेट न्यूट्रिशन च्या नेतृत्वाला दर्शवते. जागतिक पोषण संशोधनाच्या अनेक दशकांच्या अनुभवाला स्थानिक आहार पद्धतींशी सुसंगत अशा फॉरमॅट्ससोबत एकत्रित करून, या ब्रँडने संतुलित पोषण अधिक सहज बनवण्यात आणि घरगुती अन्नाला पूरक म्हणून सादर करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

हा कॅम्पेन क्रिकेट-थीम असलेल्या फिल्म्सद्वारे हे सजीव करतो, ज्यामध्ये जेमिमा रोड्रिग्स दिसते. यात पाळीव प्राणी आणि त्यांच्या पेरेंट्समधील दैनंदिन क्षण दाखवले गेले आहेत आणि PEDIGREE® ग्रेव्ही कसे नियमित फीडिंगला आनंद आणि नातेसंबंधाच्या क्षणांमध्ये बदलू शकते हे अधोरेखित केले आहे.

आयेशा हुडा, चीफ मार्केटिंग ऑफिसर ,मार्स पेट न्यूट्रिशन इंडिया,म्हणाल्या, “एक अग्रणी म्हणून, मार्स पेट न्यूट्रिशन ने भारतात ग्रेव्ही श्रेणी निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. वॉल्थम पेटकेअर सायन्स इन्स्टिट्यूट च्या अनेक दशकांच्या संशोधनाच्या पाठबळावर, आम्ही वेट फूडला एक संपूर्ण पोषण पर्याय म्हणून समज विकसित करण्यात मदत केली आहे, जो परिचित आहार पद्धतींशी सुसंगत आहे। त्या पुढे म्हणाल्या, “जरी पेट पेरेंट्सचा दृष्टिकोन बदलत असला तरी, दैनंदिन आहार पद्धतींमध्ये अजूनही एक अंतर आहे, विशेषतः घरगुती अन्नावर अधिक अवलंबून राहण्यामुळे, जे पाळीव प्राण्यांच्या पोषण गरजा पूर्ण करू शकत नाही। PEDIGREE® ग्रेव्हीसह, आम्ही आकर्षक चव आणि संपूर्ण, संतुलित पोषण एकत्र आणतो, ज्यामुळे उत्तम आहार निवडी अधिक सोप्या, संबंधित आणि दैनंदिन दिनचर्येचा भाग बनतात.” जेमिमा रोड्रिग्स म्हणाली, “एक पेट पेरेंट म्हणून, मी नेहमीच मानले आहे की पाळीव प्राण्यांची काळजी घेणे हे फक्त त्यांना खाऊ घालण्यापुरते मर्यादित नाही; तर त्यांच्या साठी काय योग्य आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. क्रिकेटमध्ये जसे योग्य पोषण परफॉर्मन्ससाठी महत्त्वाचे असते, तसेच हे आपल्या पाळीव प्राण्यांनाही लागू होते हे मला जाणवले. PEDIGREE® ग्रेव्हीबद्दल मला सर्वात जास्त आवडते ते म्हणजे माझे पाळीव प्राणी जेड याला ते खूप आवडते, आणि त्याच वेळी मला माहीत आहे की ते त्याला संपूर्ण पोषण देते.